# माणूस

शनिवार । २४ ऑगस्ट १९७४
एक रुपया

## जवाहरलाल दर्डा
## प्रहार क्रमांक ५
## या अंकी

## शिवाय....

उत्कंठा वाढविणारी एक शिकारकथा : केळयाच्या मळयातील स्वामी महाराज




नव्या वाद्यवृंदासाठी
वादक हवे आहेत. कृपया
डबे, थाळ्या वाजवणाऱ्यांनी
अर्ज करू नयेत !


स्लिप पध्दती
मान्य होईपर्यंत
झोपा !


कॉंग्रेसचा कारभार गलथानपणाचा कसा काय बुवा ?
कॉंग्रेसला युवकांना ग्लास द्यायला काय झालं होतं ? बिचाऱ्यांना दारू कपातून प्यावी लागली.


पीके वाढवा असा स्पष्ट आदेश का नाही दिला ?
आम्हाला वाटलं दाढ्या वाढवा !

# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २४ ऑगस्ट | अंक : तेरावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


## नवी चतुःसूत्री

—लोणावळ्याहून निरोप आला. आम्ही ४०-५० तरुण १५ ऑगस्टला चौकात उपोषणाला बसत आहोत. दिवसभर चर्चा, नंतर मोर्चा-सभा; १ ऑगस्टला पुण्याला शनिवारवाड्यासमोर झाला तसा एकूण कार्यक्रम. पुण्याहून कुणीतरी यावे.

—साताऱ्याहून डॉक्टर दाभोळकर यांचे पत्र. विविध संघटनानी एकत्रित येऊन स्वदेशी बहिष्काराची एक आचारसंहिता तयार केली आहे. —नाशिकला १५ ऑगस्टला दोन हजार स्त्री-पुरुष नागरिकांचा मोर्चा. —मुंबईला तर परदेशी वस्तूंच्या होळ्या.

हिंदुस्थानात कुठेही घडत नाही ते पुण्यामुंबईत, महाराष्ट्रात इतर ठिकाणी घडत आहे. आपल्या स्वातंत्र्याचे स्वदेशीकरण करण्यासाठी युवकवर्ग पुढे येत आहे, एरवी उदासीन व आपापल्या कोशात बंद राहणारा बुद्धिजीवी वर्ग युवकांना सक्रिय प्रोत्साहन व पाठिंबा देत आहे आणि मुख्य म्हणजे ही चळवळ स्वयंस्फूर्त आहे, प्रथमपुरुषी आहे. तिची सुरुवात स्वत:पासून होत आहे. भ्रष्टाचारविरोधाची सांगड येथे नवनियोजनाशी घातली जात आहे, समाजातल्या अगदी तळच्या माणसाशी चळवळीचे नाते जोडण्याचा येथे जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहे.

सुराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि नवशिक्षण ही या चळवळीची नवी चतु:सूत्री सांगता येईल. येथे स्वराज्यानंतर सुराज्य का आले नाही? कारण आपण स्वदेशीचा त्याग केला, श्रीमंत राष्ट्रांचे अनुकरण करण्यात दंग झालो, येथली माती आणि माणसे यांचा मेळ जमवून विकास, समृद्धी साधण्याचा आग्रह न धरता रशियाचे-अमेरिकेचे तंत्र आयते उचलून आणण्यात धन्यता मानू लागलो. ही धावाधाव चुकीची होती असे अनेकांना आता वाटू लागले आहे. पण ह्या अनेकांपैकी काहीजण आपण यापुढे चीनच्या मागे धावावे असेही सुचवीत आहेत. म्हणजे धावाधावीचा विचार अद्याप सुटत नाही, हेच खरे. तसे चीनपासून शिकण्यासारखे पुष्कळ आहे यात वाद नाही. पण मुख्य शिकण्यासारखी गोष्ट ही, की चीनने कुणाचेही अनुकरण केले नाही, आपली परंपरा, सद्य स्थिती यांचा मेळ चीनने अचूक घातला, म्हणून नवचीनला स्वतंत्र प्रतिष्ठा लाभली, गरीब असला तरी एक स्वयंपूर्ण देश म्हणून चीनकडे जग आदराने पाहू लागले. आपणही आपल्या हाडीमाशी खिळलेल्या अनुकरणप्रवृत्तीतून बाहेर पडले पाहिजे. आपले तंत्र आपणच येथल्या मातीशी एकरूप होऊन विकसित करायला हवे—स्वदेशीचा हा अर्थ आहे. परकीय वस्तूंवर बहिष्कार हे केवळ एक पथ्य आहे. पुढे जाऊन स्वदेशी नियोजनाचा एक वेगळा, स्वतंत्र आकृतीबंध आपण निर्माण करायला हवा आणि यासाठी शिक्षणात क्रांती हवी. नोकरशाही मनोवृत्ती जोपासणारा चालू शिक्षणक्रम बदलून तेथे नवनिर्माणाची आकांक्षा उत्पन्न करणारे, व्यक्तीला आपल्या स्वत:च्या पायावर खडे करणारे नवे, विधायक, श्रमप्रधान शिक्षण देण्याची व्यवस्था व्हायला हवी. आणि यासाठी एक वर्ष शाळाकॉलेजे बंद पडली किंवा पाडली गेली तरी त्यामुळे देशाचे काहीही नुकसान होणार नाही. दोर केव्हातरी कापावे लागतात. बिहारने ते यंदा कापून टाकले एवढेच. नवे सापडत नाही म्हणून जुन्याला किती दिवस चिकटून, लोंबकळून राहाणार? बिहारने विचार केला, असे लोंबकळत राहाण्याऐवजी अंधारात उडी घेऊ. नष्ट होऊ किंवा प्रकाशाचा एखादा नवा किरण तरी पकडू. महाराष्ट्राने विचार करावा अशी ही बिहारच्या तरुणाची अंधारातली उडी आहे. निदान एक वर्ष स्वयंस्फूर्तीने खेड्यापाड्यात जाऊन काम करायला आपल्याकडील तरुणांना काय हरकत आहे? ज्यांचे शिक्षण पूर्ण झाले आहे अशांनी तर हा निर्णय अवश्य घ्यावा. शहाद्यात असा निर्णय घेऊन काही तरुण कामास लागले आणि त्यांनी वर्षा-दोनवर्षांत साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले भाऊ मुंदडा-अंबरसिंग यांनी सुरू केलेल्या चळवळीचे सादपडसाद त्यामुळे आता सर्वत्र उमटत आहेत. शहाद्यासारख्या कितीतरी जागा महाराष्ट्रात आहेत, की जेथे तरुण रक्ताची गरज आहे, गरम प्रवाह जेथे वाहायला हवेत, जुने, साचलेले, सडलेले जेथून फेकून द्यायला हवे, नवे उभारायला हवे अशा नवनिर्माणासाठी एक वर्ष खरे तर फार कमी. पण निदान यामुळे सुरुवात तरी होते. शहाद्यात तरुण आले ते प्रथम एक वर्षासाठीच आले होते. पण पुढे साखळी जमत गेली. तसे इतर ठिकाणीही घडू शकते. असे दहा-वीस ठिकाणी घडले तर महाराष्ट्राचे आजचे नैराश्याचे वातावरण बदलून जाईल, नवा आशावाद मूळ धरील, उद्याची काही वेगळी स्वप्ने रंगवता येतील. येथली माती जागवणे, मातीचा आणि माणसाचा मेळ साधून एक नवा समाज घडवणे हे एरवी येथे होणे नाही.

श्री. ग. मा.

# सप्रेम नमस्कार....

¤ आपल्या साप्ताहिकाच्या गेल्या दोन अंकात भ्रष्टाचार निर्मूलन कार्याच्या सदर्भात व्रतनिष्ठा स्वीकारण्याची कल्पना पु. ल. देशपांडे यानी मांडली आहे. आ. नरुभाऊ लिमये यांनी ती उचलून धरून कार्यवाहीत आणण्याचे आवाहन केले आहे. पुण्यातील १ ऑगस्टच्या कार्यक्रमात या दृष्टीने चतु.सूत्रीही जाहीर झाल्याचे महाराष्ट्र टाईम्स वरून समजले.

*या व्रतनिष्ठ जीवनाचा प्रारभ स्वत.पासून करावयाचा निर्णय* आम्ही सातान्यातील विविध सघटनाच्या तरुण मडळीनी घेतला असून सातान्यातील विविध थरातील नागरिकांचा त्याला चागला प्रतिसाद मिळत आहे.

कार्यक्रमात नेमकी दिशा व निश्चित स्वरूप येण्याच्या दृष्टीने आम्ही घेणार असलेली व्रते नेमक्या स्वरुपात ठरवली आहेत. ती खालीलप्रमाणे—

यापैकी कोणतेही किमान एक व्रत किमान एक वर्ष पाळावयाचा दृढ संकल्प असलेल्यानीच ही व्रते घ्यावयाची आहेत.

(१) मी चोरट्या आयातीतून देशात आलेली वस्तू वापरणार नाही.

(२) ज्या उद्योग धद्यात गरज नसताना परकीय भाडवल गुतविलेले आहे व ज्यामुळे अमाप लूट परदेशात जाते त्या वस्तूंवर मी बहिष्कार टाकीन.

(३) सतत वाढणाऱ्या महागाईमुळे या देशातील असख्य लोकांना दोन वेळा पोटभर जेवण मिळत नाही यासाठी किमान १ वर्ष.

१ : मी कोणत्याही जाहीर मेजवानीस जाणार नाही.

२ : माझ्या घरी अत्यावश्यक नसलेली चैनीची छोटी मोठी कोणतीही नवीन वस्तू विकत घेणार नाही.

(४) माझ्या घरातील कोणत्याही सणाच्या वा समारंभाच्या प्रसगी एका हरिजन मुलीस घरच्या प्रमाणे त्या कार्यक्रमात सहभागी करून घेईन.

(५) मी हुडा घेणार नाही. देणगी या नावाखाली वा अन्य कोणत्या प्रकारे हुडा घेतलेल्या लग्नास जाणार नाही.

यापैकी एक वा अनेक व्रते त्या त्या व्यक्ती जाणीव पूर्वक गंभीररीत्या स्वीकारतील. त्याची प्रतिज्ञा पत्रकेही भरून घेतली जातील. मोहाला बळी पडण्याची सामान्याची सहज प्रवृत्ती लक्षात घेऊन या व्रताच्या आचरणासाठी सदसद्विवेक बुद्धीला त्याची सतत जाणीव देण्यासाठी, त्यातील काही व्यक्तीच्यावर विशेष जबाबदारी सोपवली जाईल.

¤ **डॉ. नरेंद्र दाभोळकर**, सातारा

¤ दिनाक १० ऑगस्टच्या 'माणूस'मधील श्री. प्रभाकर पाध्ये याचे 'हळवे' पत्र वाचले. वास्तविक दिनाक १ ऑगस्टचा मोर्चा सर्वच दृष्टीने पांढरपेशा म्हणून फारच शांततापूर्ण होता. घोषणा मात्र त्या मानाने बऱ्याच कडक होत्या. 'भ्रष्ट मत्र्यांना फाशी द्या' 'मटका बंद, दारू बद — पोलिसाना हप्ता बंद' याही घोषणा आवर्जून केल्या जात होत्या. त्यात कुठेतरी, कोणीतरी, केव्हातरी पाध्यांच्या म्हणण्याप्रमाणे जयंतराव टिळकांबद्दल घोषणा दिलीही असेल. पण त्यासाठी पाध्यानी इतके कावरेबावरे आणि हळवे होऊन '*त्याबद्दल आपण खेद व्यक्त करू या*' असे म्हणण्याचे मुळीच कारण नाही. आणि या क्षुल्लक प्रकाराला एवढे महत्त्वही द्यायचे कारण नाही. फारच झाले तर त्यानी वैयक्तिक दुःख व्यक्त करावे. त्यात सर्वांना ओढू नये. पाध्यांच्या म्हणण्याप्रमाणे आंदोलनाचे स्वागतासाठी केसरीने दि. १ ऑगस्टचा 'चहापान समारभ' रद्द केला असला तरी त्यांनी भ्रष्ट सत्तारूढ पक्षात केलेला प्रवेश आणि त्या पक्षाची उचलून धरलेली तळी हे सर्वच निषेधार्ह आणि अत्यत चीड आणणारे आहे. परवाच्या पुणे महापालिकेच्या निवडणुकीत सत्तारूढ पक्षाच्या उमेदवाराचे ढोल बडविण्याचे जे ऐतिहासिक पुण्यकृत्य जयतरावांच्या केसरीने (लोकमान्याच्या नव्हे) केले, त्याबद्दल जयतरावाचे कौतुक करावे तेवढे थोडेच. आज लोकमान्य असते तर आजच्या कोडग्या शासनाला त्यांनी चळचळा कापायला लावले असते. शासनाचा थरकाप उडून गेला असता. अशा त्या लोकमान्याच्या सुपौत्राने सध्याचे स्वतःचे बदललेले 'राजकारण' जनतेला पटवून द्यावे म्हणजे आम्ही त्यांच्याविरुद्ध घोषणा देणाऱ्याचा जाहीरपणे शनिवारवाड्यावर निषेध करू आणि जयतरावांना हारतुऱ्यांनी सुशोभित करून खांद्यावर उचलून घेऊन त्याची पुणे शहरातून प्रचड मिरवणूक काढू

१४–८–७४ **जयवंत वालावलकर**, पुणे

¤

क्र. सीएनरी–१०७४–१–६८
माहिती व जनसपर्क महासचालनालय,
महाराष्ट्र शासन,
सचिवालय, मुबई ४०००३२
दिनांक : ७ ऑगस्ट १९७४

महाशय,

आपल्या साप्ताहिकाच्या २७ एप्रिलच्या अकात 'मुख्यमत्र्याच्या तालुक्यातील दहशतवाद' या शीर्षकाखाली जो लेख प्रसिद्ध झाला आहे तो वस्तुस्थितीला सोडून असल्यामुळे वाचकाचा झालेला गैरसमज दूर व्हावा म्हणून पुढील खुलासा आपण प्रसिद्ध करावा अशी विनती आहे.

*यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यातील बेलखेड, नागापूर या गावातील लमाणी तांड्यातील लोकानी त्या परिसरात गुडगिरी करून लोकामध्ये दहशत निर्माण केली असल्याचे व त्याच्या या*

गैरकृत्यांकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले जात असल्याचे जे मत लेखकाने या लेखात व्यक्त केलेले आहे ते सर्वस्वी वस्तुस्थितीला सोडून आहे. १९७४ सालात बैलखेड गावात १२ गुन्ह्यांची पोलिसांनी दखल घेतली असून योग्य ती चौकशी व जरूर ती कारवाई केलेली आहे. एका गुन्ह्याच्या बाबतीत आरोपी पांडू वजारी यावर गुन्हा शाबित होऊन त्यास दड देखील झालेला आहे. याशिवाय चार प्रकरणी खटले भरण्यात आले असून न्यायालयात चौकशी चालू आहे. यामधील सर्व आरोपी वजारीच आहेत. तीन प्रकरणात चौकशी केली असताही कोणताही धागादोरा मिळू शकला नाही. वंजाऱ्याविरुद्ध सबधितानी भीतीने तक्रार केली नाही असा कोणताही प्रकार उघडकीला आलेला नाही. त्याचप्रमाणे आरोपीविरुद्ध संबधितानी पोलिसांकडे तक्रार केली नाही असे घडलेले नाही असे या प्रकरणी केलेल्या चौकशी वरून दिसून आले आहे. विविध पोलीस अधिकाऱ्यानी या भागात वारवार भेट देऊनही 'गुन्हा घडला आहे पण त्याबद्दल तक्रार केली गेलेली नाही' असे त्याच्या निदर्शनास आलेले नाही. या गुडाची सुटका त्यांचे दादा व तेथील स्थानिक नेते जामिनावर करतात असा जो आरोप केलेला आहे त्यातही काही तथ्यांश नाही. कारण अशा सर्व प्रकरणी पोलिसानी जामीन नाकारले असून आरोपीनी आपल्या नातेवाईकांमार्फत न्यायालयाकडून जामीन मिळविलेले आहेत.

नादेड जिल्ह्यातील हातगाव पोलीस स्टेशन हद्दीतील करोडी गावच्या आसपास पुष्कळ लोकांना झोडपण्यात आल्याचे वृत्त सत्य आहे. यावावत मोतीराम सभाजी याच्याकडून त्यास चार वजाऱ्यानी मारहाण केल्याची तक्रार आल्यानतर गुन्ह्याची नोंद घेण्यात आली व त्यापैकी तीन वजाऱ्यांना पकडण्यात आले. सक्रू फुलसिंग हा वजारी बेपत्ता असल्याने सापडलेला नाही. बिटरगावचे श्री. आनदराव पाटील यांच्याकडून तक्रार आल्यानतर उमरखेड येथील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येऊन दहा वजाऱ्याविरुद्ध आरोपपत्र (चार्जशीट) भरण्यात आले असून खटला न्यायप्रविष्ट आहे.

वाटसरूना वंजारीगुड लुटतात व त्याची सायकल, घड्याळ हिसकावन घेऊन त्याना झोडपतात हे वृत्त अतिरंजित आहे. या भागात एकट्यादुकट्यास प्रवास करणे कठीण झाले असल्याचे आपण जे वर्णन केलेले आहे तेही वस्तुस्थितीला सोडून आहे. त्याचप्रमाणे रुईच्या दुकानदाराला बेशुद्ध होईपर्यंत मारून त्याचे दुकान लुटल्याचे व त्या प्रकरणी १८ वजारी गुडानी गुन्हा कवूल केल्याचे जे वृत्त लेखात दिलेले आहे तेही निराधार आहे. अशी कोणत्याही तऱ्हेची तक्रार पोलिसाकडे आलेली नाही.

गगनमाळ जंगलातून सागवानी लाकूड नित्यनियमाने चोरण्याचा धंदा वजारी गुडांच्या साथीदारांनी सुरू केल्याचा उल्लेखही असाच अवास्तव आहे कारण अशी तक्रार पोलिसाकडे आलेली नाही. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यानी वनखात्याच्या अधिकाऱ्यांशी सपर्क साधून चौकशी केली असता कोणाही रखवालदाराच्या हातातील घड्याळ अथवा सामान हिसकावून घेतल्याचे लेखात वर्णन केलेल्या घटनेस दुजोरा मिळाला नाही.

गावठी दारूची विनापरवाना खुल्लमखुल्ली विक्री या भागात करण्यात यते असे लेखात म्हटलेले आहे. बैलखेड तांड्यातील काही वजारी दारूचा धदा करतात हे सत्य असले तरी याकडे पोलीस डोळेझाक न करता वारवार या तांड्यावर छापे घालतात व खटले भरतात हे पुढील आकडेवारीवरून सिद्ध होईल. १९६८–२७, १९६९–१८, १९७०–२०, १९७१–७, १९७२–१०, १९७३–२३ व १९७४–१२ असे दारूवदी कायद्याखाली खटले पोलिसानी भरलेले आहेत.

नादेड जिल्ह्यातील हातगाव तालुक्यातील शिराड जवळ कुणातरी व्यक्तीचे रक्ताने माखलेले कपडे सापडले असल्याचा जो उल्लेख आपण केला आहे याबाबतीत शिराडच्या पोलीस पाटलानी ६० लोकाना बरोबर घेऊन तपास केला असता त्यांना असे कपडे वगैरे काही आढळले नाही व ही एक अफवाच असल्याचे उघडीस आले.

एक म्हातारी व तिच्या दोन मुली उमरखेड जवळ शेतात गोवऱ्या वेचीत असताना त्यांच्यावर गुडानी हल्ला करून त्या मुलीची अब्रू घेतल्याची जी घटना आपण आपल्या लेखात कथन केलेली आहे तसा कुठलाही प्रकार घडलेला नाही. असे चौकशीअती दिसून आले आहे.

उमरखेड, पुसद व नागपूर परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झालेले आहे, लोकांना पोलीस संरक्षण मिळत नाही हे आरोपही कपोलकल्पित आहेत. उमरेखेड यथील रहिवाशांमध्ये वेगवेगळे राजकीय गट असले तरीही बेकायदेशीर कृत्य करणाऱ्या बैलखेल येथील गुन्हेगाराना त्यापैकी कुठल्याही गटाचा पाठिंबा नाही.

बैलखेड हे गाव पैनगगेच्या काठी उमरखेड पासून ५ किलो मीटरवर असून त्या गावाच्या भोवताली पुसद तालुक्यातील बिटरगाव व नागपूर आणि नादेड जिल्ह्याच्या हातगाव तालुक्यातील करोडी ही गावे आहेत. बैलखेडच्या लोकवस्तीत मराठा, बुद्ध आणि ६० घरांच्या वजारी ताड्याचा समावेश आहे. हा वजारी तांडा गावापासून एक फर्लांगावर आहे. या तांड्याचा गुन्हेगारीचा इतिहास गेल्या ४० वर्षाचा असून आजुबाजूच्या गावात, तसेच हातगाव तालुक्यातील गावात, बाळापूर, आखाडामध्ये आणि नादेड जिल्ह्यातील अर्धापूर तसेच परभणी जिल्ह्यातील गावात त्यानी अनेक गुन्हे केलेले आहेत. मात्र त्याच्या कृत्याकडे पोलीस डोळेझाक करीत नसून पोलिसानी वेळोवेळी तत्परतेने कारवाई करून गुन्हेगाराना पकडलेले आहे. पोलिसानी काही कारवाई केली नाही अशी घटना सापडणे मुश्कील. त्याचप्रमाणे या एका वजारी ताड्याच्या कृत्याबद्दल सबंध वजारी जमातीला दोष लावणे ही अयोग्य आहे. तद्वतच या भागात गुडांच्या कृत्यामुळे लोक जीव मुठीत धरून जगत आहेत असे चित्र रगविणेही अवास्तव आहे.

आपण प्रसिद्ध केलेल्या लेखात वर्णिलेल्या काही घटना अतिरजित तर काही सपूर्ण निराधार अशा असल्यामुळे लोकांचा झालेला गैरसमज हा खुलासा प्रसिद्ध करून आपण दूर करावा ही विनती.

**गो शं. पतके**
उपसचालक (वृत्त)
□

# ग्रामायन

महाशय

◻ गेल्या २७–२८ जुलै रोजी भरलेल्या मेळाव्यात, मला वाटते मी फक्त एकटाच पशुसवर्धन खात्यातील एक लहानसा असा अधिकारी हजर होतो. अर्थात मेळाव्यात हजर राहिलो ते एक स्वतंत्र भारतातील नागरिक ह्या नात्याने – शासकीय अधिकारी म्हणून नव्हे. माझे काही विचार पत्ररूपाने पाठवीत आहे.

सुरुवातीस स्पष्टपणे लिहितो की ह्या मेळाव्यास हजर राहिल्याने खूप खूप आनंद झाला व प्रामाणिक ग्रामीण कार्यकर्त्यास कशा प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते ह्याची कल्पनाही आली.

मी आमच्या खात्यात पशुधन, मेंढ्या व कोंबड्या सवर्धन अशा सर्व विभागात काम केल्याने ह्याविषयी माझे काही विचार मांडतो.

माणदेशात (म्हसवड, माचणी-आटपाडी वगैरे) चांगल्या सुधारलेल्या जातीचे नरवाटप, तसेच आंगोरा जातीच्या शेळ्या व बोकड वाटप असे काम कित्येक वर्षापासून चालू आहे. लोकरीपासूनच्या वस्तू बनविण्याचे काम सुद्धा चालू आहे. व अशा प्रकारचे काम मोठ्या प्रमाणावर तेथे होणे शक्य आहे. पण ह्या हवामानात उत्तम जातीची लोकर तयार होणे अवघड आहे. मेंढ्यापासून खरा फायदा मटणापासून होतो – लोकरीमुळे नव्हे. तरीपण श्री. हिरवे वकीलसाहेबाचे विचार योग्य वाटले.

रायगडच्या परिसरात व तशाच प्रकारच्या प्रदेशात शेळ्यामेंढ्या व म्हशी ठेवणे निश्चित फायद्याचे ठरेल. पण १२ महिने भरपूर पाण्याची तेथे विशेष आवश्यकता आहे. पुरंदर भागातील साळुंखे साहेबाचे कार्य ऐकून खूप आनंद झाला. पण माझ्या मते ते क्रॉस ब्रीडींग programe ला अवास्तव महत्त्व देत आहेत.

आपली म्हशीच्या दुधाची मागणी वाढत आहे – गायीच्या नव्हे. तसेच आपल्या भारतातील हवामानात व Rural Socio-Economic परिस्थितीनुसार हा Cross-Breeding व Artificial Insemination चा कार्यक्रम यशस्वी होईल असे मला तरी मुळीच वाटत नाही.

नतर लक्षात राहिले ते विचार 'नरकतीर्थ' श्री. बाबा फाटकाचे. त्यांचे भाषण अगदी साधे व किंचित विनोदाचे वाटले. पण त्यांनी Soil fertility, Breediug methods, Disease resistance; hybridization, nature's nitrogen cycle वगैरे विषयावर आपले अनुभव मांडले व ते अक्षरशः खरे आहेत.

जास्त उत्पन्नाच्या लालसेने सध्या रासायनीक खताचा प्रचंड प्रमाणात वापर होत आहे. त्यांचेबरोबर सेंद्रीय खताची आवश्यकताही विशेष आहे, पण अर्धवट ज्ञानामुळे फक्त रासायनीक खतेच वापरली जातात. त्यांच्या अतिवापरामुळे जमिनीचा PH कमी होतो व पुढे ती नापीक होते हा सुधारलेल्या देशांचा अनुभव आहे.

तीच गोष्ट सुधारलेल्या भातांच्या जातीची व हायब्रीड धान्याची. ह्या जाती नाजूक असल्याने ह्या जातीच्या पिकावर बराच खर्च व मेहनत करावी लागते व आर्थिकदृष्टया हे परवडत नाही.

प्राण्यांच्या मलमूत्राचे काय महत्त्व आहे, ह्याचे खरे स्वरूप आजतरी ग्रामीण माणसास समजलेलेच नाही. ह्या विषयावर कोसबाड येथील श्री. हरिश्चंद्रराव पाटलांनी अनेकवेळा आपले विचार मांडले आहेत व म्हणून त्यांच्या अनुभवावर शेतीचे कार्यक्रम आखणे योग्य होईल.

अन्नधान्यांच्या आजच्या प्रचंड मागणीपोटी रासायनीक खतांचा वापर व कीटकनाशकांचाही वापर वगैरे कार्यक्रम घेणे आवश्यक झाले आहे.

श्री. बाबा फाटक यांची तत्त्वे, निसर्गचक्र व आजची मागणी वगैरे गोष्टींचा एकत्रीत विचार करून सुवर्णमध्य साधणे हे निकडीचे झाले आहे.

श्री. बिंदु माधव जोशी व श्री. सुदर गवाणे ह्यांची आवेशयुक्त व कळकळीची भाषणे ऐकून मनाची मरगळ नाहीशी झाली. मला वाटते त्यांच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांची आज जरूर आहे.

श्री. बाबासाहेब करमरकर व दुसरे दिवशी स्वतः श्री. पागेसाहेब ह्यांची कळकळीची भाषणे ऐकून आपल्यापुढे किती मोठा प्रचंड प्रश्न उभा आहे ह्याची थोडीशी कल्पना आली.

ह्या मेळाव्यास हजर राहिल्याने पुष्कळ गोष्टी शिकता आल्या. प्रथमपासूनच मी माझ्या शासकीय कार्यात थोड्याशा कळकळीने व ग्रामीण उन्नतीच्या भावनेने काम करीत असल्याने मी मुद्दामच ह्या मेळाव्यास हजर होतो.

आता ग्रामायनाचे स्वरूप काय असावे ह्याविषयी माझे विचार मांडतो :

१. हे कार्य राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त असावे.

२. 'ग्रामायन' ह्या नावाची एक सस्था न स्थापन करता हे कार्य Agency स्वरूपातच असावे.

३. ग्रामीण भागात काम करण्यासाठी अनेक तरुण तडफदार विद्यार्थी, सशोधक, प्राध्यापक व तज्ञमंडळी आहेत.

अशा विषयावर काम करणाऱ्यांची मधून मधून चर्चा घडवून आणावी. अशी चर्चा व मेळावे ग्रामायनमार्फत व्हावेत.

**–गुरुनाथ दा. बेहेरे, मुंबई**

[ ग्रामायनचे काम सुरू झाल्यापासून ग्रामायनकडे ग्रामीण विकासासाठी तळमळीने काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची सविस्तर विचारप्रतिपादन करणारी पत्रे येत आहेत. त्यांच्या भोवतीच्या परिसरातील परिस्थिती, तेथील प्रश्न, राष्ट्रीय नियोजनावरील त्यांचे विचार, अनेक मौलिक सूचना, तसेच मार्गदर्शनाची अपेक्षा आपल्या ठिकाणी ग्रामायनचे काम सुरू करण्याची इच्छा अशा अनेक गोष्टी या पत्रांमधून व्यक्त होत असतात. ग्रामायनच्या कार्यकर्त्यांना ही पत्रे नक्कीच उपयुक्त आहेत, प्रोत्साहक, मार्गदर्शक आहेत. ग्रामायनचे काम अशा स्वरुपातील सपर्कानेच प्रामुख्याने वाढणार आहे याची आम्हाला कल्पना आहे. परतु या सर्वच पत्रांना 'सा. माणूस'मध्ये प्रसिद्धी देणे शक्य होणार नाही. ]

**घ. द. देशपांडे**
अध्यक्ष, 'ग्रामायन'

# सोलकढी

## □ अहाहा ! काय ते मुंबईचे कुलगुरु

मुंबई विद्यापीठाचा विषय निघाला म्हणजे माझ्यासारख्या, शब्दाची बिलकुल उधळमाधळ न करणाऱ्या, सावध माणसालासुद्धा काय लिहू आणि किती लिहू असे होऊन जाते. या विद्यापीठाचे कर्तृत्वच तसे बेमिसाल आहे. हे विद्यापीठ पाहायला देशोदेशीची माणसे येतात ते उगाच नव्हे. मुंबई विद्यापीठाने तसा लखलखीत लौकिक कष्टपूर्वक संपादन केलेला आहे. नव्या भारताच्या निर्माणात मुंबई विद्यापीठाचा फार मोठा वाटा वाहे ! (हे वाक्य मुंबई विद्यापीठाच्या एखाद्या कुलपती–कुलगुरूच्या किंवा आमंत्रित परदेशी पाहुण्याच्या औपचारिक आणि दिखाऊ भाषणातले नाही. मुंबई विद्यापीठाच्या बहुविध कार्याची सर्वांगीण व डोळस पाहणी करून मीच वरील निष्कर्ष विवेकीपणाने काढला आहे. अशा गोष्टी मला बऱ्यापैकी जमतात असे आता माझ्या लक्षात आले आहे.)

मुंबई विद्यापीठाला हे जे स्थान प्राप्त झाले आहे ते कोणामुळे, असा प्रश्न तुम्ही मला, माझा एकूण अधिकार लक्षात घेता विचारलात तर ते योग्य, उचित, आणि स्वाभाविकच ठरेल. आत्तापर्यंत याचे श्रेय मी मुंबईच्या विद्यार्थ्यांना, प्राध्यापकाना, प्राचार्यांना देत होतो. अहाहा, काय ते मुंबईचे विद्यार्थी : कधी कोणाच्या अध्यात ना मध्यात. आपण बरे, आपला अभ्यास बरा, आपले केस बरे, आपले कपडे बरे, आपले हिंदी चित्रपट बरे, आपली हॉटेले बरी, आपल्या पोरी बऱ्या, असा त्याचा वरोबस्त खाक्या. अहाहा, काय ते मुंबईचे प्राध्यापक : कधी कोणाच्या अध्यात ना मध्यात. आपण बरे, आपला व्यासंग बरा, आपल्या नोट्स बऱ्या, आपले महाविद्यालय बरे, आपले प्राचार्य बरे, आपला पगार बरा, आपल्या परीक्षा बऱ्या, आपल्या सुट्ट्या बऱ्या, आपल्या शिकवण्या बऱ्या, आपले आंदोलन बरे, आपला घसा बरा, आपला पांढरपेशा बरा, असा त्यांचा बरोबस्त खाक्या. आता उरले प्राचार्य. अहाहा, काय ते मुंबईचे प्राचार्य : कधी कोणाच्या अध्यात ना मध्यात. आपण बरे, आपले कॅबिन बरे, आपल्या सभा बऱ्या, आपले मालक बरे, आपले कुलगुरू बरे, आपला उमेटपणा बरा, आपले भक्त बरे, आपला बडेजाव बरा, आपला शिक्षणाधिकार बरा, असा त्यांचा बरोबस्त खाक्या.

मुंबईच्या विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना, प्राचार्यांना सारे श्रेय देण्यात आपली, कधी नव्हे ती, चूक झाली, असे नुकतेच माझ्या दृष्टोत्पत्तीला आले आहे. आपली चूक झाली, असे मी सहसा कबूल करत नाही. आपली चूक लोक मनमोकळेपणाने कबूल कशी करतात याचा मला नेहमी अचंबा वाटत आलेला आहे. मला चूक कबुल करण्याची लाज वाटते. पण प्रस्तुत विषयच इतका उदात्त आहे की, राष्ट्रहिताचा विचार करून, मी सुद्धा आपली चूक कबुल करायला तयार झालो. त्याचे असे झाले : १८ जुलै हा मुंबई विद्यापीठाचा स्थापनादिन आहे. आत्तापर्यंत तो तसा साजरा केला जात नव्हता. दोन वर्षांखाली, एकाएकी, तो साजरा व्हायला हवा अशी भावना विद्यापीठाला झाली. विद्यापीठाला शोभेशा औचित्याने आणि औदार्याने तो कसा साजरा करता येईल हे ठरवण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. समितीने दोन वर्षे खपून, स्थापनादिन कसा साजरा करावा ते समजावून सांगितले. त्यातली एक कल्पना अशी आहे की मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातून, प्रतिवर्षी १८ जुलै या मंगल दिवशी, मुंबई विद्यापीठाच्या थोर्थोर कुलपती-कुलगुरूंचे, त्यांच्या भारतभाग्यउजळक कार्याचे व चारित्र्याचे स्मरण करण्यात यावे. त्यापासून उद्याच्या नागरिकांना देशोद्धारक प्रेरणा लाभेल.

मी केलेल्या श्रेयविभागणीत या कुलपती-कुलगुरूंना पार विसरूनच गेलो होतो. कुलपतीना विसरलो तर एक वेळ चालण्यासारखे आहे. ते विद्यापीठाचे शोभिवत प्रमुख असतात. पण कुलगुरूंना विसरलो हा अक्षम्य प्रमाद झाला; कारण ते . विद्यापीठाचे अशोभिवंत प्रमुख असतात. विद्यापीठ तेच तर घडवत असतात. भारवर्षाच्या उभारणीत मुंबई विद्यापीठाचा जो फार मोठा वाटा आहे तो खरे म्हणजे यांचाच आहे. त्यांचे स्मरण आम्हाला सतत स्फुरणदायी घडेल, हे माझ्या लक्षात, उशिरा का होईना, पण पक्केपणाने आले आहे. झाली तशी चूक माझ्या हातून पुन्हा होणार नाही.

कुलगुरूचा विषय निघालाच आहे तेव्हा मुंबई विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू क्रांतिकंकण त्र्यंबक कृष्णाजी टोपे यांना थोडी मंत्रपुष्पांजली वाहू. टोपे कोणालाच भीत नाहीत. सेनापती तात्या टोपे यानी जशी समशेर चालवली तशी कुलगुरु टोपे जीभ चालवतात. दडपणाला बळी न पडणारी माणसे शिक्षणक्षेत्रात नाहीत, असे महावाक्य नुकतेच त्यानी उच्चारले. त्यावर केवढा गहजब. टोपे यानी आपल्या विधानाचा जाहीर खुलासा करावा, अशी मागणी 'महाराष्ट्र टाईम्स'मधून एका प्राध्यापकाने केली. त्याला काय सुचवायचे होते कोणास ठाऊक. टोपेसुद्धा शिक्षणक्षेत्रातल्या अशा बळी पडणाऱ्या माणसांपैकी एक आहेत, असे जर त्याला म्हणायचे असेल तर ते साफसपूर्ण चूक आहे, हे आम्ही आमच्या व त्याच्या (म्हणजे त्या प्राध्यापकाच्या नव्हे तर खुद्द

टोपे यांच्या) छातीवर हात ठेऊन सांगू इच्छितो. टोपे यांनी उपरिनिर्दिष्ट सूत्रात, चिल्लर आणि खुळखुळणाऱ्या माणसांचे वर्णन केले आहे. ते स्वतः वंदे आणि खणखणीत आहेत. त्यांचा कान पिळणारा बळी अजून निपजायचा आहे. थोडक्यात सांगायचे तर–

अहाहा, काय ते मुंबईचे विद्यार्थी !
अहाहा, काय ते मुंबईचे प्राध्यापक ! !
अहाहा, काय ते मुंबईचे प्राचार्य ! ! !
आणि–
अहाहा, काय ते मुंबईचे कुलगुरु ! ! ! !

## □ लोकशाहीचा सत्यनारायण

गेल्या वर्षी, प्रथमच, ऑस्ट्रेलियात, मजूर पक्षाचे सरकार सत्तेवर आले. पक्षनेते घौ व्हिटलॅम पंतप्रधान झाले. सत्तेवर आल्यापासूनच ऑस्ट्रेलियन राजकारणाला वेगळे वळण लावण्याचे प्रयत्न व्हिटलॅम यांनी सुरू केले. परराष्ट्रीय धोरणाची चाकोरी जशी त्यांनी बदलली तशी देशांतर्गत राजवटीची शैली पालटण्याचेही प्रयत्न त्यांनी केले. या बाबतीतली, नुकती घडलेली, एक हकीगत सांगण्यासारखी आहे.

देशसेवेचे व्रत घेतलेल्या ऑस्ट्रेलियन खासदारांना आपले वेतन अडतीस टक्क्यांनी वाढवून हवे होते. अर्थात ही वाढ काही त्यांना चैनीसाठी नको होती; वाढत्या महागाईला व चलनवाढीला यशस्वी तोंड देण्यासाठी ही वाढ त्यांना हवी होती. पंतप्रधान व्हिटलॅम यांच्या मनात काही भलतेच आले. वेतन वाढवण्याऐवजी शिस्तशीर काटकसर करून महागाईला तोंड द्यावे, असे त्यांनी खासदारांना सुचवले. खासदारांनीच आपल्या प्रत्यक्ष आचरणाने जनतेला मार्गदर्शन करावे, अशी व्हिटलॅम यांची कल्पना होती. त्यांनी ही कल्पना मंत्रिमंडळापुढे ठेवली. पण ११ विरुद्ध १५ मतांनी मंत्रिमंडळाने ती फेटाळून लावली. मग लोकसभेतल्या मजूर पक्षीय सर्वसाधारण सभेपुढे ही कल्पना त्यांनी ठेवली. तेथेसुद्धा, ४१ विरुद्ध ५० मतांनी ती फेटाळली गेली. अखेर ती वरिष्ठ सभागृहापुढे आली. त्या सभागृहाने मात्र २९ विरुद्ध ३१ मतांनी ती उचलून धरली. व्हिटलॅम यांच्या चिकाटीला असे यश आले. न्यायाधीश, सनदी नोकर आणि अधिकाऱ्यांचे काही वर्ग यांच्या वेतनवाढीची जी शिफारस एका मंडळाने केली होती ती पार विसरून जायचे व्हिटलॅम यांनी आता ठरवले आहे.

व्हिटलॅम यांची उंची ६ फूट ४ इंच आहे. आपल्या उंचीचा त्यांना गर्व झालेला दिसतो. राजकारणात इतक्या ताठपणे चालून कोणाचा निभाव लागत नाही; पाठीचा कणा लववून उंची उणी करावी लागते, एवढी साधी गोष्ट या उंचखोर पंतप्रधानाला समजू नये याचे मला तरी बाबा फारच आश्चर्य वाटले. व्हिटलॅम यांचे सहकारीसुद्धा पुचाटपोपडे दिसतात. पाठिंबा काढून घेऊन व्हिटलॅम यांची त्यांनी भंबेरी उडवली नाही यावरून राजकारणातली त्यांची ईयत्ता कोणती आहे, हे सर्वांना कळून चुकले आहे.

ऑस्ट्रेलियाच्या तुलनेने भारतातले राजकारण किती प्रगल्भ आणि परिपक्व आहे. येथे महागाई व चलनवाढ आज पुष्कळ वर्षे आहे; पण म्हणून काही आम्ही फाफलो नाही. आमचे खासदार, आमदार, नगरसेवक (यांनाच पूर्वी 'नगरपिते' म्हणत. नगरपित्यांमधल्या स्त्री-पित्यांना 'नगरमाता' म्हणत किंवा कसे, ते मला आठवत नाही.) लोकशाही राववण्यासाठी झटतझगडत असल्यामुळे अलीकडेच त्यांनी आपले भत्ते वाढवून घेतले आहेत. येथली अमर जनता ऑस्ट्रेलियन जनतेसारखी अडाणी व अजागळ नाही. शिकण्यासाठी ती खासदारआमदारांच्या आदर्शासाठी थांबत नाही. तिच्या अशिक्षित पाटवाला पूर्व गोलार्धात तरी तोड नाही. शिवाय लोकशाहीसाठी काय वाटेल ते करायची तिची तयारी आहे. लोकशाहीचा सत्यनारायण पावण्यासाठी खासदार–आमदार–नगरसेवकांना भरपूर दक्षिणा द्यावी, असे राज्यपुराणात सांगितले आहे, हे आम्हाला ठाऊक आहे. आमच्या ऑस्ट्रेलियन बांधवांना ते ठाऊक दिसत नाही.

लोकशाहीचा सत्यनारायण त्यांना कसा पावणार कुणास ठाऊक. बिच्चारे.

**–अनंतराव**



# जोरीलालजी (जवाहरलालजी दर्डा)

## प्रहार क्रमांक पाच : झुंबरलाल भरुट, यवतमाळ

महाराष्ट्र विधान सभेमध्ये सहकार मंत्री श्री. यशवंतरावजी मोहिते यानी दिलेल्या आश्वासनानुसार आमदार श्री. शरद दिघे यांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनॅन्स सोसायटीच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी नेमल्याचे जाहीर झाले असून या समितीने तातडीने कामाला सुरुवातही केल्याचे दिसते. माणूस साप्ताहिकाच्या दिनाक ९ मार्च, ७४ मधील माझ्या लेखात मी यवतमाळ येथील विद्याविहार सहकारी गृहबांधणी सस्थेची त्रोटक माहिती दिली होती. दिघे समितीने इतर कोणत्याही संस्थाची माहिती पहाण्याचे श्रम न घेता केवळ या एकाच सस्थेची जरी सपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला तरी महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनॅन्स सोसायटीने या सस्थेस मुक्त हस्ताने केलेले लाखो रुपयांचे कर्जवाटप कसे बेकायदेशीर आहे व चेअरमन या नात्याने दर्डाजीनी इतर शेकडो सस्थांचे अर्ज वर्षोगणती धूळ खात पडलेले असताना याच सस्थेला कर्ज मजूर करण्यात कसा उत्साह दाखविला हे स्पष्ट होईल.

विद्या विहार गृह निर्माण सहकारी सस्था हे नाम धारण करणारी ही सस्था स्थापन करण्यात आली १९७० साली. ५ सप्टेंबर १९७० रोजी ती रजिस्टर करण्यात आली. (रजिस्ट्रेशन नबर १४८), सुरुवातीला या सस्थेचे पुढील प्रमाणे एकूण तीस सदस्य होते.

१ : प्राचार्य एम्. एच. खेरकर
२ : प्रा. जी. एन. रूथला
३ : प्रा. आय. एल्. पगारीया
४ : प्रा. शकर तुकाजी सागळे
५ : प्रा. काकलिया
६ : प्रा. कोलते
७ : प्रा. ढोले
८ : प्रा. खर्चे
९ : प्रा. पातालवन्सी
१० : श्री. एस बी. महाजन
११ : श्री. एम. ए. कार्लेकर
१२ : श्री. एम् एस् बोरुडिया
१३ : श्री. जी. बी. लोडासे
१४ : श्री. बी. बी. लोडासे
१५ : श्री. डी. जी. गांधी
१६ : श्री. आर. पी. दर्डा (जैन)
१७ : श्री. एम्. आर. भोयर
१८ : श्री. इस्माईलखान
१९ : श्री. आर. के. पिसाळकर
२० : श्री. राजकिशोर शर्मा
२१ : श्री. एम. जी. नडगीरकर
२२ · श्री. प्रताप बडकस
२३ : श्री. एन्. के. शेटे
२४ : श्री. एम्. एम् वरमुडे
२५ : श्री. आर. आर. टोळीवाल
२६ : श्री. आर. डी. मोरे
२७ : श्री. एस. के. भागवत
२८ : श्री. बी. जे. ठाकूर
२९ · एस. के. दानव
३० . श्री. के. एम. आवड

वरील पैकी पहिले चवदा सदस्य दर्डाजी अध्यक्षपद भूषवीत असलेल्या अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कारकून अगर चपराशी वगैरे विविध पदावर काम करणारे आहेत व इतर दर्डाजीचे नातेवाईक, त्याचे स्नेही अगर त्याच्या वैयक्तिक नोकरीत असलेले असे आहेत. अमोलकचद महाविद्यालयाचे अध्यक्षपद दर्डाजीनी दोन वर्षांपूर्वी त्यांचेविरुद्ध झालेल्या प्रखर विद्यार्थी आदोलनाचे वेळेस सोडले असले व या पदावर काही गुळाचे गणपती बसविले गेले असले तरी खरी सत्ता अद्यापही दर्डाजीच्याच हाती आहे. अमोलकचद महाविद्यालय ज्या विद्या प्रसारक मडळामार्फत चालविले जाते त्या विद्या प्रसारक मडळाला महाविद्यालया नजीकचीच एक जागा बक्षिस मिळालेली होती या जागेचा उपयोग विद्यार्थीवर्गासाठी खेळाचे मैदान म्हणून व्हावा, दुसऱ्या कोणत्याही उपयोगासाठी तिचा वापर करू नये, अगर ती विकू नये असा स्पष्ट उल्लेख सबधित बक्षिसपत्रात करण्यात आला आहे. असे असूनही ही जागा विद्या प्रसारक मडळाने विद्या विहार गृह निर्माण सहकारी सस्थेला चवदा ऑक्टोबर, १९७१ रोजी रजिस्टर केलेल्या विक्रीपत्राअन्वये दोन लाख रुपयांना विकून टाकली. या जागेचे एकूण क्षेत्रफळ दहा हजार चौरस फुटापेक्षाही कमीच येते. म्हणजे ही विक्री वीस रुपये चौरस फूट या भावाने झाली. हे विक्रीपत्र होऊन जवळ जवळ तीन वर्षे पूर्ण होत आली आहेत. अद्यापपर्यंत वीस रुपये चौरस फूट भावाने यवतमाळात एकही विक्रीपत्र झालेले नाही. व आजही दीड ते दोन रुपये चौरस फूट भावात या जागेनजीकच्या जागा उपलब्ध आहेत. ही जागा मोक्याची होती, भरवस्तीत होती, किंवा इतर काही महत्त्व जागेला होते असेही मुळीच नाही.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे याच काळात अमोलकचंद महाविद्यालयाची आर्थिक स्थिती फार डबघाईला आलेली होती. जर ही जागा विकून विद्या प्रसारक मंडळाला दोन लाख रुपये मिळाले होते तर त्या पैशातून अमोलकचद महाविद्यालयावरील विविध देणी फेडून टाकता आली असती. हे करण्यात आलेले नाही. मग हे दोन लाख रुपये गेले कोठे ? विद्या प्रसारक मडळाने त्याचा विनियोग कशा रीतीने केला व ते कोठे खर्ची घातले ही माहिती उजेडात येणे आवश्यक आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की हा संपूर्ण व्यवहार म्हणजेच एक बनवाबनवीचा मामला आहे. वर ज्या तीस सदस्यांची नावे उद्धृत केली आहेत त्या तीस सदस्यांकडून प्रत्येकी साडेसहा हजार रुपयाप्रमाणे रक्कम वसूल करण्यात आली असे दाखविण्यात येऊन या रकमेतून ही जागा विद्या विहार सहकारी सस्थेने विकत घेतली असा भास निर्माण करण्याचा प्रयत्न येथे झाला आहे. मुळात कोणत्याच सदस्याकडून साडेसहा हजार रुपये वसूल केले नाहीत व विद्या प्रसारक मडळालासुद्धा ते देण्यात आलेले नाहीत. या विक्रीपत्रावर स्वाक्षरी आहे विद्या प्रसारक मडळाचे होयबा सेक्रेटरी अॅडव्होकेट श्री. बर्वे याची. आणि याच विद्या प्रसारक मडळातर्फे चालविल्या जाणाऱ्या अमोलकचद महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. खेरकर हे या प्रकरणात आहेत विद्या विहार सहकारी गृह बांधणी सस्थेचे अध्यक्ष या नात्याने.

खरेदी खत व्हायचाच अवकाश. झटपट लगेच केस तयार करण्यात येऊन महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनॅन्स सोसायटीकडे मजुरीसाठी पाठविण्यात आली, आणि इतर सोसायटचाचे अर्ज दहादा परत केले जात असताना आणि वर्षोगणती पैशाचे अभावी धूळ खात पडलेले असताना या सस्थेला मात्र लगोलग कर्ज मजूर झाले. एकूण सात लक्ष अठ्याण्णव हजार रुपये. मजुरी दिनाक आहे १६ मे १९७२.

रक्कम आली. या रकमेतून प्रत्येकी पधरा घरांचे दोन गाळे बाधावयाचे ठरले. कामाला सुरुवात झाली. इतकेच नव्हे तर १९७२ अखेरपर्यंत ३,९९,०००।– रुपये खर्चही करण्यात आले. एवढी रक्कम खर्च झाली खरी पण झालेले काम पाहिले तर पन्नास हजार रुपये तरी या कामावर खर्च झाले असतील किंवा नाही याची शकाच यावी !

वर ज्या तीस सदस्याची यादी दिली आहे त्यापैकी चार तर चपराशी आहेत. आणि हे जे गाळे बाधण्यात येत आहेत त्या गाळचात तर आहेत सारे २०′ × २५′ अगर ३०′ × २५′ चे भव्य हॉल्स. शिवाय सुरुवातीपासून सतत या सोसायटीत चालत असलेल्या भानगडीमुळे वैतागून जाऊन आणि या लफडचातून लवकर बाहेर पडावे या इच्छेने आतापर्यंत वरील तीस सदस्यापैकी पंधरा सदस्यानी आपले राजिनामे सस्थेच्या अध्यक्षाना सादर केले आहेत. त्यापैकी काही अध्यक्षानी परस्परच मंजूर केले असून त्याबद्दलची सूचना सबधीत सदस्यानाही देण्यात आली आहे. पण गमतीची गोष्ट ही की हाऊसिंग फायनॅन्स सोसायटीतर्फे मजूर केलेले लोन याच सदस्याचे नावावर असल्यामुळे याबद्दलची माहिती हाऊसिंग फायनॅन्स सोसायटीला अगोदर देणे आवश्यक होते. ती अद्यापही देण्यात


# वॉटरगेट

गेल्या काही दिवसांमध्ये वारंवार
ऐकायला-वाचायला मिळालेला शब्द.

वस्तुतः हे आहे एका इमारतीचे नाव.
पण आता ते राजकीय भ्रष्टाचाराशी
कायमचे निगडीत झाले.

अमेरिकेच्या आतापर्यंतच्या इतिहासात
एवढे गंभीर प्रकरण घडले नव्हते.

राष्ट्राध्यक्षपदावर आपली फेरनिवड व्हावी
या निक्सन यांच्या हव्यासातून जन्म
पावलेली खळबळजनक कहाणी—
साऱ्या देशाला हादरवून सोडणारी,
साऱ्या जगभर गाजलेली.

या सनसनाटी कृष्णकारस्थानाचा
साद्यन्त वृत्तान्त

दि. ७ व १४ सप्टेंबर माणूस

# विवेकभ्रष्ट

आलेली नाही. आणि म्हणून या राजिनामा मंजुरीला काहीच अर्थ उरत नाही. शिवाय या तीस सदस्यांपैकी अनेकांची यवतमाळातच इतरत्र घरे आहेत पण असे असूनही त्याचेकडून खोटी ॲफिडेव्हिटस घेऊन त्यांची कर्जे मजूर करण्यात आली आहेत.

चॅरिटेबल ट्रस्ट ॲक्टखाली विद्या विहार मडळाचे पजीयन करण्यात आलेले असल्यामुळे मडळाच्या जागेची विक्री करीत असताना चॅरिटेबल कमिशनरची पूर्वसमती घेणे आवश्यक होते. ही पूर्व संमती या प्रकरणात घेण्यात आलेली नाही.

थोडक्यात म्हणजे महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र स्टेट हाऊसिंग फायनॅन्स सोसायटी, डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार को ऑपरेटिव्ह सोसायटीज यवतमाळ, डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार, चॅरिटेबल कमिशनर, आणि विद्या प्रसारक मडळ व विद्या विहार सहकारी गृह निर्माण सस्थेचे सदस्य या सान्याना फसवून किंवा अधारात ठेवून स्वत.चा स्वार्थ साधण्यासाठी दर्डाजीच्या सुपीक डोक्यात तयार झालेला हा एक बनाव आहे. आणि म्हणूनच दिघे समितीला सत्य हुडकून काढण्याची खरोखरच तळमळ असेल आणि दर्डाजीसारख्या मातब्बर शहेनशहाशी प्रसंगी दोन हात करण्याची या समितीची तयारी असेल तर मुंबईतील किंवा इतर विभागातील गृहनिर्माण सस्थामधील घोटाळ्याना हात घालण्यापूर्वी या समितीने एकदा यवतमाळला धूळभेट द्यावी झालेल्या कामाची पहाणी करावी. आणि नि.पक्षपाती रीतीने आपला अहवाल शासनाला सादर करावा. असे झाले तर त्यातून नागडे सत्य बाहेर आल्याशिवाय रहाणार नाही.

मुख्य मत्र्याशी असलेल्या आपल्या सबधाचा उपयोग करून घेण्याची कोणतीही सधी दर्डाजीनी आजपर्यंत सोडलेली नाही. मग भलेही मुख्यमत्री ही गोष्ट कबूल करोत अगर नाकबूल करोत. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डाचे सदस्यत्व दर्डाजीनी या प्रकारेच मिळविले. या सदस्यत्वाचा त्यानी कसकसा गैरवापर केला याची साद्यत माहिती मी लवकरच देणार आहे. दर्डाजीच्या मालकीच्या दर्डा उद्यानात आपण कधी गेलात तर त्या ठिकाणी इलेक्ट्रिक लाईनचा मुक्त सचार सर्वत्र आढळेल. या कामासाठी इलेक्ट्रिसिटी बोर्डाने ट्युबलर पोल्स वापरले आहेत. वास्तविक हे पोल्स न वापरता अशा कामासाठी गर्डर पोल्स वापरावेत असा बोर्डाचा नियम आहे. पण बोर्डाचे नियम असतील तर ते सामान्य माणसासाठी. दर्डाजीचा नि नियमाचा सबधच काय ? असे आलतु फालतु नियम तर ते केव्हाच पचवून टाकतात. त्यानी ट्युबलर पोल्स तर मिळविलेच पण आपल्या उद्यानाचे सपूर्ण फेन्सिंगही बोर्डाकडून परभारे करून घेतले. या उद्यानात होत असलेला वीज पुरवठा अगदी आता आतापर्यंत नगरपालिकेच्या सार्वजनिक लाईनवरून केला जात होता, इतक्यात त्यात बदल झाला असेल तर त्याची मला माहिती नाही. बगिच्याच्या कामासाठी दोन लोखडी गाड्याही इलेक्ट्रिसिटी बोर्डाच्या वर्कशॉपमध्ये तयार करवून घेण्यात आल्या. बोर्डाच्या *गाड्या म्हणजे तर दर्डाजीची वैयक्तिक मालमत्ताच. पण दर्डाजीच्या* नावावर त्याचा वापर कोठेच लिहिलेला आढळणार नाही. नाही म्हणायला दोन वर्षांपूर्वी बोर्डाच्या सर्वच गाड्या नागपूरकडे बेळा येथे गेल्या असल्याची नोद लॉग बुकमध्ये केली गेली आहे. दर्डाजीच्या युवराजाच्या विवाह समारभाचे वेळेस झालेल्या या ट्रिप्स आहेत. आणि मुख्य गोष्ट अशी की लॉगबुकवर या सबधातील एन्ट्री दर्डाचे वैयक्तिक सहाय्यक श्री. एम्. आर. भोयर याच्या हातची असून त्याची खाली सही सुद्धा आहे.

दर्डाजीच्या अनेक भानगडी मी आतापर्यंत चव्हाटयावर आणल्या आहेत. आणि त्याची फळेही मला भोगावी लागत आहेत. माझ्या लेखाविरुद्ध फिर्याद दाखल करीन असे जेव्हा दर्डाजीनी जाहीर केले तेव्हा ही फिर्याद यवतमाळ किंवा पुणे यांपैकी कोणत्यातरी न्यायालयात दाखल केली जाईल अशी माझी अटकळ होती. पण एकाऐवजी दोन फिर्यादी दाखल झाल्या आणि त्याही नागपूर आणि चद्रपूर येथील न्यायालयात. आता आणखीही काही फिर्यादी दाखल होणार आहेत असेही मधून मधून मला सागितले जाते. फिर्यादीची भीती मला नाही. दर्डाजीची ताकद मी दुसऱ्या कोणापेक्षाही जास्त जाणतो. आणि तरीही मी निश्चितपणे सागतो की महाराष्ट्राच्या सव्वीस जिल्ह्यातूनच नव्हे तर सपूर्ण भारतातूनही जरी दर्डाजीनी माझ्यावर अशा फिर्यादी उभ्या केल्या तरी माझ्या ताकदीप्रमाणे मी त्याना तोड देईनच देईन. पण माघार मात्र निश्चित घेणार नाही. कदाचित कोणाला माझे हे बोल अतिशयोक्तीचेही वाटत असतील पण माझी पूर्ण खात्री आहे, यात शेवटी जय माझा होणार आहे. कारण सत्य माझ्या बाजूला आहे.

दर्डा प्रकरणावर महाराष्ट्र टाईम्सने लिहिलेल्या अग्रलेखात असे म्हटले होते की यात दर्डाजी दोषी ठरले तर त्यानी निदान आपले जवाहरलाल हे नाव बदलावे. महाराष्ट्र टाईम्सच्या सपादकाना काय कल्पना, की हे नाव सुद्धा दर्डाजीनी चोरले आहे म्हणून ! जवाहरलाल हे दर्डाजीचे मूळ नाव नाहीच, त्याचे नाव आहे ' जोरीलाल. '

जोरीलालचा जवाहरलाल कसा झाला हा एक स्वतत्र नि मजेदार किस्सा आहे. तो पाहू पुढील एखाद्या लेखात, तूर्त एवढेच पुरे.

□ □

---


# श्रीग्रामायन

**प्रसिद्ध झाले**
**मूल्य पंधरा रुपये**

**लेखक**
**श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**


---

# पाक लष्कराविरुद्ध बलुचींचा लढा

वा. दा रानडे

बांगला देशच्या अनुभवावरून काही धडा न शिकता बलुचिस्तानातील बलुचीची चळवळ दडपून टाकण्यासाठी त्याच प्रकारची क्रूर, अमानुष लष्करी दडपशाही पाक फौजानी त्याच्यावर चालविली आहे. फील्ड मार्शल आयुबखान आणि जनरल याह्याखान यानाही मागे टाकणारी लष्करी राजवट बलुची व पठाणांना सहन करावी लागत आहे असे उद्गार सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान यानी गेल्या महिन्यात कराचीतील एका साप्ताहिकास दिलेल्या मुलाखतीत काढले होते. त्यानंतर परिस्थिती सुधारण्याऐवजी दडपशाही वाढतच आहे. पाक फौजांनी सातशे बलुचींना ठार केले अशी माहिती खान अब्दुल वली खान यांनी पाकिस्तान नॅशनल असेंब्लीत सागितली. या दडपशाही-पुढे न नमता बलुचींनी आपला लढा जिद्दीने चालविला आहे. पाक सरकारने वृत्तपत्रावर घातलेल्या निर्बंधामुळे त्याच्या बातम्या मात्र फारशा बाहेर येत नाहीत. बलुची टोळ्यांशी होणाऱ्या चकमकीत महिन्याला ५० ते ६० पाक सैनिक ठार किंवा जखमी होतात अशी बातमी बी. बी. सी. वर काही दिवसापूर्वी सागण्यात आली. ब्रिटीश वृत्तपत्रे व रेडिओ-वर साधारणपणे पाकला अनुकूल बातम्या देत असतात. तरीही बी. बी. सी. ने ही बातमी दिली. यावरून परिस्थिती प्रत्यक्षात केवढी गभीर असली पाहिजे याची कल्पना करता येईल.

पतप्रधान भुट्टोनी बलुचिस्तानात काही दिवसापूर्वी दौरा केला. कडक बदोबस्तात त्यानी हा दौरा केला तरीही त्याच्यावर हल्ल्याचा प्रयत्न झाला. बलुची किती सतप्त झालेले आहेत याचेच ते निदर्शक होते. दौऱ्यात भुट्टोनी बलुचीच्या मागणीबाबत तडजोडीची वृत्ती दर्शविली नाही. उलट अधिक दडपशाही करण्याच्या त्याना धमक्या दिल्या. पर्वतातील त्याच्या आश्रयस्थानावर विमानातून बॉंबफेक करण्यात येईल असे भुट्टोनी सांगितले.

एक दोन टोळ्यांची ही किरकोळ चळवळ आहे असे पाक सरकार आतापर्यंत भासवीत होते पण त्यावर कोणाचा विश्वास बसणे शक्यच नव्हते. छोटीशी चळवळ दडपण्या-साठी एवढा मोठा लष्करी ताफा कशासाठी याचे भुट्टोजवळ उत्तर नव्हते.

बलुचीच्या लढ्याला आता पद्धतशीर गनिमीयुद्धाचे स्वरूप आले आहे. 'आउटलुक' या कराचीच्या साप्ताहिकासाठी डी. शहा-खान यानी बलुचिस्तानातील परिस्थितीची सविस्तर पहाणी करून लेख लिहिले. त्यात बलुचीच्या चळवळी सबधी बरीच नवी माहिती प्रथमच बाहेर आली आहे. बलुची तरुणानी पाक सरकारच्या दडपशाहीचा व पिळवणुकीचा सशस्त्र प्रतिकार करण्यासाठी 'सशस्त्र प्रतिकार जनता आघाडी' (पॉप्युलर फ्रंट ऑफ आर्मड् रेझिस्टन्स) अशी सघटना स्थापन केली आहे. सध्याच्या चळवळीची सूत्रे ही सघटनाच चालवीत आहे. राष्ट्रीय अवामी पक्षाच्या सौम्य व घटनात्मक भूमिके-मुळे नाराज झालेले सर्व गट या सघटनेत एकत्र आले आहेत. 'एकदोन सरदारांच्या सागण्यावरून पाक फौजाशी लढणारी एखाद दुसऱ्या टोळीची ही सघटना नाही. 'आमच्या राष्ट्रीय अधिकारासाठी आम्ही लढत आहोत.' असे सघटनेच्या एका पत्रकात म्हटले आहे.

मार्च ते जून अखेरच्या चार महिन्यात या सशस्त्र सघटनेने पाक फौजाशी शभर चकमकी केल्या. पाक फौजावर छुपे हल्ले करणे, तारा-टेलिफोन दळणवळण तोडण्या-साठी, घातपात करणे, सरकारी मालमत्तेचा विध्वस करणे वगैरे स्वरूपाचे हे हल्ले होते. या गनिमाशी लढणे पाक सरकारला फार महाग पडत आहे. बलुचिस्तानातील लष्करी मोहिमेवर पाकने आतापर्यंत दोनशे कोटी रुपये खर्च केला आहे.

या संघटनेची राजकीय भूमिका ठर-विण्याचे काम राजकीय विभागाकडे आहे. या विभागातर्फे नियमित बुलेटिन्स प्रसिद्ध होतात त्यात ही भूमिका विशद केलेली असते. 'इस्लामाबादचे सरकार बलुचि-स्तानच्या कारभारात कोणताही हस्तक्षेप करणार नाही अशी स्पष्ट घटनात्मक हमी आम्हाला हवी. बलुचिस्तानच्या जनतेने निवडलेल्या प्रतिनिधींनी स्थापलेल्या सर-कारलारला कोणताही अडथळा न येता कारभार करता आला पाहिजे. आम्ही अजून पाकमधून फुटून निघण्याचा विचार केलेला नाही. पण आम्हाला त्या काठापर्यंत ढकलू नका, ते आत्मघातक ठरेल' अशा शब्दात या सघटनेने आपली भूमिका मे मधील बुलेटिनमध्ये माडली आहे.

विध्वस अटळ असल्याचा सूर जूनच्या बुलेटिनमध्ये आहे. 'भुट्टो राजवटीने आमच्या-विरुद्ध सुरू केलेल्या लष्करी मोहिमेपासून आमचा बचाव करण्यासाठी पर्वतातील दऱ्या-खोऱ्यांचा आसरा आम्ही घेतला असल्याचे आम्ही अनेक वेळा म्हटले आहे. आमच्या लोकशाही व राष्ट्रीय अधिकारासाठी आम्ही लढत आहोत. पाकमधून फुटून निघण्याचा मार्ग पत्करणे आम्हाला भाग पडावे अशा हालचाली भुट्टो राजवट गेले सोळा महिने करीत असताही फुटून निघण्याची कल्पना आम्ही कधी मनात बाळगली नाही. पण आता निराळे चित्र आमच्यापुढे उभे अस-ल्याचे दिसत आहे. 'विध्वसाच्या अटळतेचा कायदा' पाकिस्तानात आता सुरू झाल्याचे आम्ही पहात आहोत' असे या बुलेटिनमध्ये म्हटले आहे.

बलुचिस्तानमधील सघर्ष अजून निर्णायक टप्प्यास आलेला नाही. एकदोन टोळ्यांचीच ही चळवळ आहे असे भासविण्याचा पाक सरकारने केलेला प्रयत्न फसला. लोकनियुक्त सरकार अधिकारावरून दूर करून भुट्टो राजवटीने तेथे स्थापलेल्या नामधारी सर-कारला लोकाचा पाठिंबा मिळविण्यातही अपयश आले. उलट बलुचीच्या लढ्यास पाठिंबा वाढत आहे. सर्व बलुची टोळ्या तर एकत्र आल्याच आहेत, शिवाय पठाण आणि पाकचे इतर भागातून बलुचिस्तानात स्थायिक झालेले पजाबी वगैरे लोकही त्याना सामील झाले आहेत. कलातच्या खानाना भुट्टोनी बलुचिस्तानचे गव्हर्नर नेमले. बलुचिस्तानचा प्रश्न तडजोडीने सोडवायचा असेल तर राष्ट्रीय अवामी पक्षाच्या नेत्याशीच बोलणी केली पाहिजेत अशी सूचना त्यांनी केली होती. पण पाक सरकारने ती फेटाळून लावल्याने ते आता राजिनामा देण्याच्या विचारात आहेत. भुट्टोनी नेमलेला गव्हर्नर सुद्धा त्याच्या बाजूला राहिलेला नाही हेच बलुचिस्तानातील परिस्थिती किती स्फोटक आहे याचे निदर्शक आहे. बलुचिस्तानची दरीखोरी गनिमी लढ्यास सोयीची आहेत. बलुची दीर्घकाळ लढा चालू ठेवू शकतील. भुट्टोनी तडजोड केली नाही तर बलुचिस्तानचा 'बांगला देश' होणे अटळ ठरेल. □

# केळ्याच्या मळ्यातील स्वामी महाराज



लेखक : केनेथ अँडरसन

अनुवाद : का. धों. देशपांडे

निलगिरीच्या पायथ्याशी बरेच केळींचे मळे आहेत. तेथे एके सायंकाळी एक साधू महाराज भटकत आले. एका झोपडी-पाशी जाऊन तेथील माणसाला दीनवाणे त्यांनी विनंती केली,

" मी एक गरीब साधू आहे. हिमालया-पासून यात्रेला सुरवात केली, आता रामे-श्वराला जाणार आहे. संध्याकाळ झाली व अजून समोर निलगिरीचा भयंकर चढ चढावयाचा आहे. तेव्हा रात्रभर मला निवारा द्यावा. खूप मेहेरबानी होईल. रात्र-भर जरा आराम घेऊन, सकाळी मी उटक-मंडकडे चालता होईन. "

झोपडीत राहणाऱ्या मळ्याच्या मालकाचे नाव कंठा असे होते. साधूमहाराजांच्या या विनंतीमुळे त्या भाबड्या माणसाला धन्य वाटले. एवढेच नव्हे तर या साधू माणसाच्या आगमनामुळे आपला मळा व भाग्य, कोणी सांगावे चांगलेच फळाला येईल असा विचार करून तो हात जोडून नम्रपणे म्हणाला,

" जरूर बाबा जरूर ! समोर खरोखरच फार मोठा घाट चढावयाचा आहे. हिमालया-पासून थकलेले आपण, एक रात्रच काय पण चांगले ७–८ दिवस येथे रहावे, आराम करावा व पुढे जावे. माझी हरकत नाही. उलट गरिबावर ती कृपा होईल. "

एवढे बोलूनच कंठा थांबला नाही. पाहुण्याच्या स्वागताला त्याने आपल्या बागे-तील दुरडी भरून केळी, घट्ट मलईयुक्त दूध व त्यावर साखर त्याने त्यांच्यापुढे केली.

हे स्वागत त्या भटक्या साधूला इतके आवडले की एक आठवडाच काय पण नंतरचे अनेक आठवडे तो तेथेच राहिला. जाण्याचे नावच काढीना. तेथेच राहण्याचे विचार बोलून दाखवू लागला.

" आपल्याला जर कायमची छानदार झोपडी दिली, आपल्या चरितार्थाची सोय केली तर या मळेवाल्याला मी भरपूर आशी-र्वाद व समृद्धी आणून देईन ' असे तो म्हणे,

मळेवाल्याने भीत भीतच याला संमती दिली. साधुमहाराजांचे मानले नाही तर त्यांचा कोप व्हायचा. काय करावयाचे. साधूला एक छानदार झोपडी मिळाली. कष्ट न करता दूध–केळी वगैरे खावयास मिळू लागले. व्यवस्थित जमले.

या भागात राहणारे हे साधेभोळे लोक इरीला या जमातीचे आहेत. या लोकांच्या हळू हळू लक्षात आले की हा साधू मोठा विचित्र आहे. संध्याकाळचे जेवण तो लवकर उरकून आपल्या झोपडीत स्वतःला बंद करून कधीही बाहेर येत नसे. कधी कधी रात्री बराच वेळ तेलाचा दिवा मिणमिणताना झोपडीच्या फटीतून दिसे. काय करतो रात्री हा साधू ?

आणि एका माणसाला काही राहवले नाही. साधू झोपडीत गेल्यावर त्या माणसाने झोपडीच्या फटीला डोळा लावला. आत कोणी नव्हते ! झोपडी रिकामी होती ! !

साधूबाबा कोठेतरी बाहेर गेले असतील. जरा वाट बघावी म्हणून हा चौकस माणूस शेजारच्याच केळींच्या खुंटात लपून बसला. साधुमहाराजांना आज पकडावयाचेच अशा निश्चयाने तो माणूस वाट पहात होता.

काही मिनिटे गेली. व त्या साधूच्या झोपडीच्या पलीकडे असलेल्या जंगलातून वाघाने मोठी डरकाळी फोडली.

लपून बसलेला तो इसम थरथर कापू लागला व आपल्या घराकडे धूम पळत सुटला. पळत असताना त्याने तेवढ्यात मागे वळून पाहिले. त्याची अपेक्षा अशी की वाघोबा शेजारचे जंगल ओलांडून लांब लांब उड्या मारीत आपल्या पाठलागावर

येत असणार. पण काय आश्चर्य ! ज्या दिशेने वाघ येण्याची अपेक्षा होती त्याच दिशेने संथ पावले टाकीत, निर्भयपणाने तो साधू येत होता.

परत आल्यावर त्या माणसाने ही हकीगत सर्वांना सांगितली. रात्र पडल्याबरोबर व्याघ्र-राजाबरोबर गुजगोष्टी करावयास जाणारा हा माणूस कोण असावा या अचंब्यात ती गरीब बिचारी माणसे पडली.

त्यानंतर त्या साधूच्या झोपडीच्या आस-पास वाघाच्या डरकाळचा ऐकू येणे हे दर-रोजचेच झाले. त्याच्या ओरडण्यावरून तो नर असावा हे सहज लक्षात येत होते.

त्या भागात नर-मादी असे अनेक वाघ होते. पण हा वाघ मात्र या भागात निश्चितच नवा होता. मळयाची हद्द संपताच जे जंगल सुरू होते तेथेच त्याने आपले निवासस्थान केले. तेथील लोकांना सकाळच्या वेळी त्याच्या पावलाचे ठसठसीत ठसे सर्वत्र आढळत. उटकमंडहून येणाऱ्या रस्त्यावर, रस्त्याच्या बाजूला, कधी शेजारच्या ओढयाच्या किनाऱ्यावर, कधी मळे व जंगल यांच्या-मध्ये असलेल्या पट्ट्यावर, तर कधी केळींच्या बागातील दंवाने भरलेल्या ओलसर माती-तही हे ठसे दिसत. साधूच्या झोपडीभोवती देखील अनेक वेळेस असे ठसे दिसत.

जवळ जवळ प्रत्येक रात्री, विशेषतः अवसेला अगर प्रतिपदेला, वाघोबा वस्ती-जवळ येत असे. त्यामुळे रात्र झाल्यावर लोक घराबाहेर पडावयास घाबरू लागले. मात्र वाघाच्या इतक्या जवळ व कायम वास्तव्याचे असंख्य पुरावे मिळून देखील एकाही महाभागाने त्याला दिवसा ओझा-रते देखील पाहिले नाही.

बांबू तोड, पिकलेली चिंच गोळा करणं किंवा तेथे चाललेली रस्ते दुरुस्ती अशा कामासाठी जंगलात अनेक कामगार होते. याशिवाय जंगलात ठिकठिकाणी चराऊ राने विखुरलेली असत. तेथे इरीला जातीचे अनेक गुराखी होते. उटकमंड भागात जे श्रीमंत जमीनदार असत ते आपली जनावरे जंगला-तील अशा चराऊ रानात पाठवीत. गुराखी दिवसभर येथील मऊ मऊ गवत असलेल्या रानात आपली गुरे चरवीत असत व रात्र पडली की त्यांना खास तयार केलेल्या बंदिस्त कुपणात ठेवण्यात येत असे. गुराख्यांना



' जा. माझ्या हातून काहीतरी भयंकर होण्याआधी येथून चालता हो. '

दिवसा रानात वाघाचे चांगले बचकेएवढे पजाचे ठसे सर्वत्र आढळत. रात्र पडली की त्याच्या डरकाळ्यांनी ते हैराण होत असत. यामुळे आपल्या जनावरावर कधी तरी या वाघोबाचा हल्ला होणार याची खात्रीच त्याना पटली होती.

पण त्यांना वाटत होते त्याप्रमाणे हल्ला निदान दिवसातरी झाला नाही. वाघाने गुरे नेण्याचा थोडा अवघडच मार्ग पत्करला. रात्री गुरे ज्यावेळी बदिस्त जागेत सुरक्षित आहेत असे गुराख्याना वाटे, त्याचवेळी वाघाने गुराना ओढण्यास सुरुवात केली.

या जागाच्या भोवती साधारणपणे ५ फूट उचीच्या लाकडी उभ्या दाडचा व त्यामध्ये काटेरी झुडपे भरलेले असे कुंपण असे.

या गुराख्यापैकी बुदीया नावाचा इरीला गुराखी होता. त्याला एका सकाळी असे दिसून आले की आपल्या कळपातील तपकिरी रगाची एक धष्टपुष्ट दुभती गाय नाहीशी झाली आहे. लाकडी कुंपणाला कोठेही धक्का लागला नव्हता. मात्र कुपणाच्या आजूवाजूच्या मऊ मातीत वाघोबाचे पंजे इतस्तत उमटलेले दिसत होते. याचा अर्थ असा की वाघाने प्रथम कुपणाच्या भोवती फिरून पाहणी केली. ज्या ठिकाणी ते काही इचानी कमी उच होते अशा ठिकाणावरून त्याने आत उडी मारली. गाईला धरले व ते ओझे घेऊन परत कुपणाबाहेर उडी मारून तिला घेऊन गेला. ज्या ठिकाणी वाघाने गाईला मारले तेथे या गोष्टीचा स्पष्ट पुरावा दिसत होता. गाईच्या खुरानी जमिनीवर वाकडया तिकडया रेघोटया उठल्या होत्या. गाईच नरड फोडलं गेल्यामुळे जे रक्त झिरपले होते ते जमिनीवरच घट्ट झाले होते. गमतीची गोष्ट म्हणजे गाईचे ओझे घेऊन वाघाने जी उडी मारली होती त्यामुळे त्या ठिकाणी कुपणाचा वरचा भाग बाहेरच्या दिशेने मुडपला होता. ज्या ठिकाणी वाघाने हे ओझे घेऊन उडी मारली त्या ठिकाणी मऊ मातीत पडलेला खड्डाही स्पष्ट दिसत होता.

बुदीयाने ही गोष्ट आपल्या इतर सहकाऱ्याना सांगितली आणि त्यानतर ते सर्व गुराखी आपापल्या कुपणाची उची वाढवण्याच्याच्या कामात गर्क झाले.

पण हे काम तसे अवघड व जिकरीचे होते. प्रत्येक कुपणात २ किंवा ३ इरीला असत. गुर चारण्याच्या कामाकडे लक्ष द्यावे लागे. व बाकीच्याना, खाब तोडून आणणे, जमिनीवर योग्य त्या ठिकाणी पुरणे ही कामं करावी लागत. हे दुसरे काम त्यामानाने अवघड. तेव्हा जो तो तेच टाळण्याच्या मागे असे. त्याच्यातून भाडणे वादविवाद वगैरे निघत.

या सगळ्या गडबडीत वाघाने निरनिराळ्या कुपणातून आणखी चार जनावरे हाणली. ज्या तऱ्हेने पहिली गाय त्याने नेली त्याच तऱ्हेने ही जनावरे पण वाघाने रात्रीच नेली. कुंपणावरून नेण्याला म्हशी किंवा रेडे जड पडत म्हणून त्याने त्यांना मात्र हात लावला नाही.

आता मात्र या इरीला जमातीत चागलाच कल्लोळ उडाला होता. त्याच्यातील जे म्हातारे होते ते म्हणत,

'अरे वाघ का नव्याने आम्ही पहातो आहोत', आमच्याकडील कळपातून दरवर्षी कितीतरी जनावरे तो दुष्ट पळवतो. मधून मधून माणसे खाणारा वाघही येत असे. पण वाघ ही जी जनावरे पळवी ती दिवसाढवळ्या, सूर्यमहाराजा देखत. मोकळ्या जागेत चरावयास आलेले एखादे जनावर मागे राहिले किंवा पाणोठ्यावर एकटे दुकटे पाणी प्यावयास गेले की ते तो उडवी. किंवा नरभक्षक असेल तर एकटया दुकटया वाटसरावर किंवा काटक्या, फळे गोळा करावयास गेलेल्या कामकऱ्यावर हल्ला करीत असे. पण तेही दिवसा उजेडीच.

पण आता मात्र हे सगळे विपरीतच जाहे की हो! हा धटिंगण रात्री येतो व जनावरे नेतो. त्याची पावले चक्क सगळीकडे दिसतात व ५ जनावरे गायब झालेली आहेत तेव्हा चेटूक, भूत वगैरे काही नाही हे तर नक्की. पण असे कधी घडल्याचे आठवत नाही बुवा!'

वाघ ज्या पद्धतीने आपले भक्ष्य पळवीत होता त्यावरून तो अतिशय धूर्त व कमालीचा बेडर होता हे सिद्धच होत होते. आणि असे जनावर जर माणसाच्या मागे लागले तर आपली धडगत होणार नाही या विचाराने ही माणसे कमालीची भदरली.

अशा अवस्थेतूनच त्याच्यात कुजबूज सुरू झाली. आजूबाजूला कोणी नाही असे पाहून दबक्या आवाजात ते आपला भयकर सशय व्यक्त करीत.

'अहो, तो...तो आपल्याकडील नवा आलेला साधू व...हा वाघ... एकमेकात दोस्त असतील काय? हा साधू गुप्तपणे त्या जनावराला गुरावर हल्ला करण्यास सागत तर नसेल!...' अशी ही कुजबूज हळूहळू पाण्याच्या लाटेप्रमाणे सर्व ठिकाणी पसरत चालली.

थोडयाच काळात १५ मैलाच्या परिसरातील, पार म्हैसूरच्या सरहद्दीपर्यंतच्या भागातील कुपणाची उची चागली १० फुटापर्यंत वाढली. कुपणे आणखी बळकट पण करण्यात आली. आता वाघोबा डोके कसे चालवतो याची गुराखी वाट पहात बसले.

आणखी एक चमत्कारिक घटना घडली व अंधश्रद्धाळू इरीलावर भीतीचा आणखी एक जोरदार फटका बसला.

त्याच सुमारास एका रानटी हत्तीने केळीच्या बागेत घुसून खूप उपद्रव द्यावयास सुरुवात केली. तेव्हा कठाने–मळ्याच्या मालकाने विचार केला की आपल्या जुन्या पद्धतीच्या बदुकीने २-४ शिशाचे तुकडे हत्ती पुन्हा येईल तेव्हा उडवावेत व काही नाही तर निदान हत्तीला भीती तरी बसून तो पुन्हा येण्याचे धाडस करणार नाही. यावेळी चादणी रात्र असल्यामुळे दूर सुरक्षित ठिकाणी बसून आपल्याला गोळी झाडता येईल असा त्याने अदाज केला.

झाले! आपल्या बागेच्या एका कोपऱ्यात झाडाच्या आड कठा दडून बसला व आपली वाग लुटणाऱ्या त्या दुष्टाची वाट पहात बसला.

पण त्या रात्री तो हत्ती आलाच नाही. त्याऐवजी त्याने ऐकली ती वाघाची भयप्रद डरकाळी. अगदी जवळून आलेली. एकदा नव्हे तर पुन्हा ऐकू आली. वाग सपल्यावर थोडी मोकळी जागा होती व नंतर जगल सुरु होत होते. त्या मोकळ्या जागेत शुभ्रधवल चांदण्या प्रकाशात कठाला काही हालचालीची जाणीव झाली. त्याने डोळे फाडफाडून बघितले. आणि? नक्कीच. झुडपाच्या त्या जजाळातून कोण्या प्राण्याची अस्पष्ट आकृती साकार झाली.

कठाने पुन्हा पाहिले. शंकाच नको. त्याच्या समोर वाघच होता. ज्याने नुकत्याच भयप्रद

गर्जना केल्या होत्या तोच हा वाघ. ज्याला कोणीही पाहिले नव्हते व ज्याने एवढा गोंधळ माजविला होता तोच हा वाघ. आपल्या जमातीमध्ये भाव मारण्याची केवढी नामी संधी ही !

जुन्या पद्धतीच्या बंदुकीला हे अंतर जास्तच होते 'आपल्यापाशी नवी रायफल असती तर काय बहार झाली असती !' कठाने विचार केला, 'पण पर्वा नाही. या या जुन्या शस्त्रानेच जमवू.' आणि कंठाने त्या जुन्या बंदुकीने नेम धरला. गोळीच्या होणाऱ्या भक्ष्याची हालचाल लक्षात घेतली व ज्या बाराने तो आता 'हिरो' होणार होता तो बार काढण्यासाठी त्याने बंदुकीचा चाप ओढला.

त्या बाराचे खरोखर फार दूरगामी परिणाम झाले. पण कठा 'हिरो' बनला की नाही हा मात्र वादाचा मुद्दा आहे. त्या जुन्यापान्या शस्त्रातून निघालेल्या दोन तीन तुकड्यांनी तरी त्या रात्री आपला वेध टिपला हे नक्की. कारण वाघाने एक प्रचंड डरकाळी फोडली. व त्या पाठोपाठ त्या भ्यालेल्या माणसाच्या म्हणण्याप्रमाणे एक भयानक किंकाळी ऐकू आली व वाघोबा एकदम दिसेनासा झाला. कठा भिऊन धावत धावत परत आपल्या झोपडीत दार घट्ट बंद करून बसला हे सांगावयाची काहीच गरज नाही.

दुसरा दिवस. कठाच्या मुलाने साधुसाठी नेहमीप्रमाणे केळी, दूध, मलई वगैरे आणले. तेव्हा त्या मुलाला आश्चर्याचा झटकाच बसला. झोपडीचे दार आतून बंद होते. दरवाजापाशी व वाटेवर साकळलेल्या रक्ताचे थेंब पडले होते.

भीत भीत त्या पोराने बैराग्याला हाक मारली.

"बाबा, ओ बाबा, दार उघडा'

पण आतून काही उत्तर आले नाही. थोडा वेळ गेला. नंतर खोल जखमी आवाजात साधूने त्या मुलास जाण्यास सांगितले. त्यावर मुलाने आपण खाण्यासाठी फळे व मलई आणल्याचे सांगितले. पण तब्येत ठीक नसल्याने साधूने काही खावयाचे नाही असे सांगितले.

त्या मुलाला राहवेना. त्याची जिज्ञासा खूप वाढली व त्याने विचारले,

'बाबा बाहेर रक्ताचे थेंब पडले आहेत. आपल्याला काही लागले तर नाही ना ? मी काही मदत करू का ?

साधू रागातच फुत्कारला, 'चालता हो म्हणतो ना. जा निघून.'

आपण एवढे चांगले वागत असताना साधूने असे वागावे याचे त्या पोराला आश्चर्य वाटले. आपल्या आईबापाला सांगण्यासाठी तो घरी परतला.

आपण वाघावर त्या' रात्री जी गोळी झाडली त्याचे काय झाले याची कठा काळजी करीतच होता. आपल्या घरधनिणीशिवाय त्याने ही गोष्ट कोणालाच सांगितली नव्हती. पण आता मुलाने हे जे सांगितले त्यामुळे तो चांगलाच चक्रावून गेला.

त्याच्या मनात जी भयंकर शंका होती ती कशी पडताळून पहावी यावर त्याने बराच विचार केला व त्याच्या बुद्धीप्रमाणे त्याला मार्ग सापडला. घाईघाईने, अनवाणी तो साधूच्या झोपडीपाशी आला. हळूच दार ढकलल्यासारखे केले. जमिनीवर मुलाने सांगितल्याप्रमाणे रक्ताचे डागही दिसत होते.

पण दरवाजा आतून घट्ट बंद करून घेतला होता.

तेव्हा तो जरा उजवीकडे वळला. गुडघे टेकून बांबूच्या फटीतून बघण्यासाठी त्याने आपली डोळा तेथे लावला. तेवढ्यात डाव्या बाजूला बारीकसा आवाज झाला. तेव्हा त्याने बाजूला बघितले. झोपडीचा दरवाजा उघडला होता. रागाने आपले डोळे लाल करीत भयंकर मुद्रेचा तो साधू त्याच्याकडे बघत होता ! त्याच्या उजव्या दंडावर कसले तरी फडके बांधले होते. त्या फडक्यावर ऐके ठिकाणी वाळलेल्या रक्ताचा तपकिरी डाग दिसत होता.

अपराधी भावनेने कठा त्याच्या पायावर पडला व अडखळत म्हणाला,

महाराज, आजारी आहात कळले म्हणून मदतीला आलो'

'खोटारड्या त्यासाठी झोपडीत अशा तऱ्हेने डोकवत होतास काय ?' साधू रागाने गरजला. 'जा. माझ्या हातून काहीतरी भयंकर होण्याआधी येथून चालता हो.'

आणि साधूने रागाने धाडकन दार लावून घेतले. आश्चर्यचकित झालेला कठा बिचारा अवाक् होऊन गेला.

घाईघाईने तो आपल्या घराकडे परतला. चेटूक, जादुटोणा जाणणारा हा बैरागी आता आपला कसा सूड घेईल या विचाराने तो अगदी व्याकूळ झाला होता.

आठ एक दिवसानी वाघाने दुसरी गाय पळवली. कुंपणाची उंची आता खूपच वाढली असल्याने उडी मारून आत जाणे व त्यापेक्षाही भक्ष्याचे ओझे घेऊन परत येणे अशक्य झाले होते.

तेव्हा त्या विलक्षण जनावराने दुसरी युक्ती केली. यावेळी आपल्या बळकट पंजाने त्याने उचकाउचक करून कुंपणात तो खालून शिरला. पण त्याला परत येता येईना. कारण मारलेल्या गाईचे ओझं त्याला कुंपणातून काढता येईना. तेव्हा तो ते टाकून तसाच परत गेला.

या प्रसंगानंतर इरीला जेवढे घाबरले तेवढाच वाघोबा धीट बनत चालला. आता माणसे घाबरली आहेत हे त्याच्या लक्षात आले व त्याने आपली चाल बदलली. केवळ रात्री हल्ले करण्याच्या ऐवजी तो आता दिवसा ढवळ्या दिसू लागला. ओढयाच्या काठावर, केळीच्या बागाजवळ तो चालत असलेला दिसू लागला. इरीला जी जनावरे चरावयास नेत त्याच्यावर तो बेधडक तुटून पडू लागला. कोणाचीही भीती न बाळगता.

आता वाघाच्या बाबतीत पुढील दोन टप्पे अटळ होते. बागेजवळ राहणारा बैरागी यांचा संबंध आता सर्वांना माहीत होता. त्यामुळे वाघाला मोकळ रान मिळाले. दुसरे म्हणजे कळपातील जनावरावर हल्ला झाला तर त्यापैकी या भीतीमुळे मदतीला पण कोणी जाईनासे झाले.

पण प्रत्येक नियमाला अपवाद हा असतोच. एके दिवशी एका पोरगेल्या गुराख्याच्या कळपातील एका म्हशीवर वाघाने त्या गुराख्याच्या देखत हल्ला केला. वाघाला मागे ढकलावे म्हणून म्हशीने जोरात पुढे मुसंडी मारली. इतर म्हशी नेहमी करतात त्याप्रमाणे, त्या म्हशीच्या मदतीला वाघाभोवती शिंगे रोखून गोळा झाल्या.

म्हशीच्या या वागण्याने गुराख्यालाही धीर आला. तो जोरात पुढे घुसला व आपला दंडा त्या वाघाच्या नाकाडावर त्याने हाणला. वाघ जोरजोरात गुरगुरला त्याने ती म्हैस सोडली व पोराच्या अंगावर उडी घेतली.

पोरगा कोलमडत खाली पडला व वाघ त्याच्या अंगावर आला.

मुलाच्या सुदैवाने इतर म्हशींना संधी मिळाली व एकत्र जमून त्यांनी त्या वाघावर युद्धातील घोडदळाप्रमाणे सरळ हल्ला केला. वाघ आता त्यांच्या तीक्ष्ण शिंगांच्या तावडीत सापडला होता.

वाघ त्या बहाद्दर म्हशींबरोबर झुंज देण्यास थांबलाच नाही. तो पळून गेला. म्हशींच्या या कृत्यामुळे त्या गुराखी पोराचे प्राण काही काळ तरी वाचले. पण त्यांच्या त्या धावपळीने त्या पोराला वाघाच्या दात व पंजामुळे ज्या जखमा झाल्या होत्या, त्यात भरच पडली. त्यांच्याकडून तो पोरगा चांगलाच तुडवला गेला.

त्यानंतर रात्रभर ते दुर्दैवी पोरगं कोणाचीही मदत न मिळता त्याच ठिकाणी तडफडत होते. मात्र त्याच्या जनावरांनी रात्रभर वाघ परत येऊ नये म्हणून त्याच्या भोवती सक्त पहारा ठेवला. दुसऱ्या दिवशी जवळपासच्या इतर गुराख्यांनी एक गट केला व ते त्याच्या शोधास निघाले. त्यांना तो पोरगा शेवटी सापडला. पण त्याला झालेल्या असंख्य जखमा, व त्या रात्रभर उघड्या राहणे यामुळे त्याचे जगणे अशक्यच होते. उटकमंडच्या हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी वाहनाची व्यवस्था करीत असतानाच त्या पोराची प्राणज्योत विझली.

नंतरचा तुलनात्मकदृष्ट्या बराच काळ शांततेचा गेला. आजूबाजूच्या कळपात देखील वाघाची काहीच हालचाल नव्हती. बऱ्याच जणांना वाघाने जागा बदलून तो दुसरीकडे कोठेतरी गेला असावा असे वाटले.

पण एके सकाळी एक इरीला रस्त्याने जात असताना, पाठीमागच्या बाजूने अकस्मात एक लांडोर पंख फडफडवीत उडून दुसरीकडे गेल्याचे त्याने पाहिले. लांडोरीची ही कृती पाहताच इरीलाला वाटले की तेथे लांडोरीची अंडी किंवा पिल्ले असणार व मिळाली तर खावयास काहीतरी चमचमीत मिळेल म्हणून मोठ्या आशेने लांडोरी जेथून उडाली तेथे हा गेला.

परंतु लांडोरीच्या त्या उड्डाणाचे कारण वाघ होता. गवत ओलांडताच अगदी समोरासमोर वाघाची व इरीलाची गाठ पडली. नजरानजर झाली.

वाघाला इरीलाचे ते येणे साहाजिकच आवडले नाही. इरीलाची तर बोबडीच वळली होती. काहीही कारण नसता वाघाने त्याच्यावर झेप घेतली. व त्याला ठार मारले. त्यानंतर पश्चात बुद्धीने किंवा केवळ चौकस बुद्धीने त्याने त्या माणसाच्या छातीचा काही भाग खाल्ला व मांडीचे लचके तोडले.

वाघाला ते मांस आवडले आणि त्या दिवशी एक नरभक्षक वाघ अस्तित्वात आला.

वाघाच्या वाढत्या धीटपणाने लोकांची काळजी हळूहळू वाढत होती. आता त्याच्या या कृत्याने त्यांच्यात धडकीच भरली. भीतीने ते चळचळा कापू लागले व


जर
किंमती
वाढल्या तर

तुम्हांला ही गोष्ट
करतां येईल.

गरजेपेक्षा जास्त खरेदी करायचीच नाही.
ज्यांच्यापाशी उधळायला पैसा आहे
ते वाटेल त्या किंमतीला खरेदी करूं शकतात.
पण केवळ एवढयाच लोकांच्या उत्तेजनावर
विसंबून राहून कोणाहि व्यापाऱ्याला भाव
वाढ करतां येणार नाही. खरं म्हणजे सगळं
कांही अवलंबून असतं तें तुमच्या खरेदीवरच !)

असल्या अविवेकी व्यापाऱ्यांचे उद्देश हाणून
पाडा. "शॉपिंग" टाळा. आवश्यक तेवढयाच
वस्तु विकत घ्या. किंमती वाढल्या तर गांगरून
जाऊन जास्त खरेदी करूं नका. तसं केलंत तर
भाववाढ नक्कीच होईल, याची खात्री बाळगा.

जरूर तेवढीच खरेदी करा

davp 74/178

लोकाची खात्री झाली की, तेथे आलेल्या वैराग्याचा या प्रसंगाशी व वाघाशी अगदी निकटचा संबंध आहे.

वाघासंबंधी मात्र मतभेद होते. काही लोक असे मानीत की, साधू व नुकताच बनलेला नरभक्षक यांचा अगदी जवळचा असा संबंध आहे तर इतराना असे वाटे की, साधू व वाघ हे एकच आहेत. साधूला पाहिजे तेव्हा वाघाचे रूप घेता येते. मागे ज्या काही घटना घडल्या त्याचेही स्पष्टीकरण या दुसऱ्या मतामुळे मिळत होते. वाघाचे त्या भागात येणे व साधूचेही त्याच वेळी त्या भागातील पदार्पण, कठाने जनावराला जखमी करणे व त्याच वेळी साधूच्या झोपडीबाहेर रक्ताचे थेंब दिसून साधूच्या हाताला जखम होणे साधूच्या झोपडीच्या आसपास वाघाचे ओरडणे वेळी अवेळी ऐकू येणे, त्याच्या पावलाचे ठसे झोपडीच्या आसपास सापडणे, गुरे नेताना त्याने सुरुवातीला वापरलेली हुशारीची आगळी पद्धती व आता घडलेला इरीलाचा मृत्यू या सगळ्याची संगती नाहीतर कशी लावावयाची ?

दुसरी चमत्कृतीपूर्ण गोष्ट अशी की, सुरुवातीला साधूच्या झोपडीत जो इरीला डोकावला होता व त्यासंबधी निरनिराळ्या अफवा ज्याने उठवल्या होत्या, त्यालाच वाघाने आता मारले होते. निश्चितच साधूने त्याचा काटा काढला होता.

काही दिवसानी कठाच्या नेतृत्त्वाखाली इरीलाचे एक शिष्टमडळ मोठ्या धाडसाने साधूच्या भेटीस गेले. सर्वांनी साधूला साष्टांग नमस्कार घातला. त्याची क्षमा मागितली व कसेही करून वाघाच्या तावडीतून आम्हाला सोडवावे अशी काकुळतीची विनवणी केली. ते पुढे असेही म्हणाले की, साधुमहाराज जर स्वतःच व्याघ्रराज असतील तर त्यानी आता कोणाला मारू नये. दया करावी. आणखी महाराजांना नरबळीची आवश्यकताच असेल तर त्या तिकडे घाटावर बडागा जातीचे लोक आहेत किंवा उत्तरेला आणखी १० मैलावर कुरुवा जातीचे लोक आहेत तिकडे जाऊन महाराजानी किंवा वाघाने आपली भूक शमवावी असे त्यानी नम्रपणाने सुचवले.

स्वामीने शिष्टमडळाच्या या म्हणण्याचा विचार गंभीरपणे केल्यासारखे दाखवले व नतर तो म्हणाला,

"हे बघा, जर मला येथील इरीला महिन्याला शभर रुपये, पुरेसे तेल, तूप, तांदूळ, भाजीपाला व आपली नेहमीची केळी, साखर पेरलेली मलई देण्याचे कबूल करीत असतील तर त्यांच्या म्हणण्याचा मी विचार करण्यास तयार आहे."

इरीलांनी मान्यता दिली. स्वामी म्हणाला की, मी दुसरीकडे लक्ष वळवण्यास तयार आहे. स्वामी नक्कीच वाघ आहे याची खात्री पटली.

पण महिन्याला १०० रुपये, तूप, तादूळ, भाजीपाला वगैरे कोठून आणावयाचे ? एवढे पैसे दर महिन्याला कसे उभे करावयाचे ? त्यानी आपापसात कुजबुजत सौदा ५० रुपयांवर तुटतो का हे बघितले. पण स्वामी पक्का होता. तो काहीही कमी करावयास तयार नव्हता. वाटाघाटी फिसकटल्या. ते मुकाट्याने निघून आले.

आणखी चार दिवस गेले. वाघाने एक इरीला नेला. आपल्या झोपडीपासून फर्लांगावर असताना वाघाने भर दुपारी त्याला ओढला. हा इरीला त्या शिष्टमडळात होता ही एक सूचक गोष्ट आणि नतर स्वामीची मागणी मान्य झाली हे सांगावयास नकोच. ◻

कथेच्या नमनालाच घडाभर तेल लागले. मान्य आहे मला. पण भारतीय जगलातील राहणाऱ्या लोकाच्या श्रद्धा, विश्वास वगैरे कशा असतात याचे स्पष्ट चित्र मला उभे करावयाचे होते. ही सर्व कथा त्या केळीच्या बागापाशी असलेल्या नदीच्या काठावर आम्ही शेकोटी पेटवून बसलो होतो तेव्हा मला जशी सागितली गेली तशीच मी तुम्हाला सांगितली.

मला गोष्ट सांगणाऱ्या इरीला माणसाचे नाव होते बुरा. मी शिकारीला या भागात आलो की तो मला मदत करावयाचा.

या भागातील हे आदिवासी लोक सुरुवातीस परक्याशी नीट बोलत नाहीत. थोड्याशा दुराव्याने किंवा घुमेपणाने वागतील. त्याना बोलते करावयाचे एक खास कौशल्य आहे ते जमले की हे लोक तुम्हाला जगल, पशूजीवन, तेथील लोक, त्यांच्या संबयी, लोककथा या संबधीच्या ज्ञानाचे भाडारच तुमच्यापुढे उघडे करतील. ही गोष्ट तशी अवघड नाही, त्याना अगदी मोकळेमाकळे वाटायला लागले की झाले. तुम्ही स्वतः जर चांगले गप्पिष्ट असाल तर तुम्हाला ते सहज जमेल. असो.

ज्या रात्री एका विशाल आम्रवृक्षाखाली आम्ही बसलो असता बुराने ही विलक्षण कथा मला सांगितली ती रात्र मला चागली स्पष्ट आठवते. आजूबाजूला रानटी हत्ती प्रचड बाबू कडाकड मोडीत होते. त्याचे आवाज सतत ऐकावयास येत होते. या हत्ती व नरभक्षकाच्या अस्तित्वामुळे आम्ही खूप मोठी शेकोटी पेटवली. त्यात मोठमोठे ओडके टाकून ती सतत जळत ठेवली होती. हे ओडके आम्ही दिवसाच जमवले होते. थडी चांगलीच कडाक्याची पडली होती. शेकोटीतील जाळाच्या सतत धगेमुळे देखील अंगातील हुडहुडी जात नव्हती. आम्ही दोघे एकमेकाला अगदी चिकटून बसलो होतो. बुरा वारंवार शेकोटीत ढलप्या वगैरे घालीत होता तर मी शेकोटीतील ओडक्याचे निखाऱ्यात रूपातर होत होते याकडे टक लावून बघत बसलो होतो.

मार्टीन सॅंट्सेल या नावाचा माझा एक उटकमडमध्ये मित्र होता. त्याने मला या वाघाविषयी लिहिले. येताना उटकमंडमध्ये एक दिवस रहावे असेही त्याने सुचविले. तेथून या केळीच्या बागा १२ मैलावर होत्या. व ते अतर चालतच जावयाचे होते.

सॅंट्सेलने सुचविल्याप्रमाणे मी उटीला एक दिवस राहिलो व दुपारी ४ वाजावयाचे सुमारास केळीच्या बागापाशी आलो. बुरा जवळपासच रहात होता. मला पाहिल्याबरोबर त्याला खूप आनद झाला. तेथील लहानशा नदीच्या काठावर आंब्याच्या झाडांखाली शेकोटी पेटवून तेथे रात्र काढावयाची असे आम्ही ठरवले.

शेकोटीतील उसळत्या ज्वाळामुळे प्रकाशाचे एक वलय तयार झाले. त्या वलयाच्या पलीकडे काळाकुट्ट अधार होता. त्या अधाराकडे बघत, कोणीतरी ऐकेल अशा भीतीने बोलावे तशा दबल्या आवाजात बुराने मी तुम्हाला सागितली ती हकीगत तमिळमध्ये सांगितली. शेवटी तो म्हणाला,

"दोराई, खरं म्हटल तर तुम्हास हे मी

सागावयास नको होते. त्या व्याघ्रस्वामीला व त्याचे सरक्षण करणाऱ्या त्या शक्तीला, कोठेही काहीही नुसते कुजबुजले तरी ऐकावयास जाते. त्यामुळे मी तुमच्यापाशी हे बोललो म्हणून माझ्यावर स्वामी खूप रागावून मला नक्की ठार करील,"

त्याचे हे शब्द सपतात न सपतात तोच प्रतिसाद यावा त्याप्रमाणे नदीच्या पलीकडून, माझ्या अदाजाप्रमाणे फर्लांगभर अंतरावरून वाघाने मोठ्याने डरकाळी फोडली.

आँ, आँ...आँ...आँ...आँ....

माझ्या शेजारी असलेला बुरा एकदम ताठ झाला व नतर थरथर कापू लागला. म्हणाला, "दोराई, हाच तो वाघ, सैतान... स्वामी...त्याने माझे बोलणे ऐकले. मी आता खलास झालो. आता जगण्याची आशा नाही. मी आता काय करू ?" कसेतरी शब्द त्याच्या गळयातून बाहेर पडत होते.

माझ्या मागच्या मानेवरील केस ताठ उभे राहिले होते. त्यामुळे काहीतरी अस्वस्थ बोचक जाणीव होत होती. सर्व शरिराला दरदरून घाम फुटला होता. पण बेडरपणाचा, बेफिकीरीचा देखावा वरकरणी करीत मी त्याला म्हटले,

"गाढवपणा, शद्ध मूर्खपणा आहे हा बुरा. निव्वळ भाकडकथा सांगतोयस् तू. तो एक साधा रक्तमासाचा वाघ आहे. अगदी साधा, एकादेवेळी नरभक्षकही असेल. पण मनुष्याने वाघाचे रूप घेणे, सैतान, अदृश्य-शक्ती वगैरे वगैरे काही नाही. समजल ?"

सहजगत्या मी आपली भरलेली ४०५ बदूक गुडघ्याच्या बाजूला ठेवली. ३ सेलची विजेरी घेतली व वाघाची डरकाळी आली त्या दिशेला प्रकाश टाकला. शेकोटीच्या प्रकाशामुळे विजेरीचे बिंब अगदीच फिक्के वाटले. काहीच नीट दिसेना.

सगळीकडे शात होते. थोड्यावेळाने वाघाने पुन्हा डरकाळी फोडली. यावेळी ती आम्ही नदीच्या बाजूला होतो त्याच बाजूने पाठीमागून आली. उथळ पाण्यातून त्याने नदी ओलाडली असावी.

शेकोटीत मी आणखी लाकडं टाकली. आमच्याकडे जे जळण होते ते रात्रभर पुरेल की नाही याची मला काळजी वाटू लागली. तस जळण कमी होते अशातला भाग नव्हता. पण वाघ अगदी जवळं असल्यामुळे रोजच्यापेक्षा शेकोटी मोठी ठवावी लागणार होती.

त्या दुसऱ्या डरकाळीनतर पुन्हा शातता पसरली. खोल, भेसूर व दीर्घ अशी शातता. वाघाने पुन्हा पुन्हा ओरडावे असे आम्हास वाटू लागले. त्याच्या ओरडण्यामुळे निदान त्याची जागा तरी समजत होती. आता कसलाही आवाज नाही. त्यामुळे जनावर मैलभर लाब असेल किंवा काही यार्डावर आपल्या जवळच्या झुडपातही लपून बसले असेल, कसे वाटावयाचे !

शेकोटीच्या प्रकाशाने तेजाचे जे वर्तुळ होते त्या पलीकडून जगलातून अस्पष्ट अशी पानाची सळसळ ऐकू येत होती. मागील झुडपात वाघ दबा धरून बसला आहे. हळूहळु तो पुढे येत आहे आता उडी घालावयाच्या अतरावर तो आला आहे. नतर सबंध शरिरातून तीव्र वेदनेची लहर...व नतर काही नाही...काही नाही असे चित्र आम्ही आमच्यापुढे रगवीत होतो.

अपेक्षित पण एकदम असा वाघाचा हल्ला आमच्यावर होईल असे आम्हाला वाटत होते. बरा भीतीमुळे असबद्ध बडबड करीत होता. त्याच्या बोलण्यातून 'सूड' व 'आपल्यापैकी कोणीही सकाळी सूर्योदय पाहणार नाही' हे शब्द मला वारवार ऐकावयास येत होते.

सोबत्याने आताच सागितलेली गोष्ट, त्या पाठोपाठ वाघाचे ओरडणे, यामुळे माझाही धीर हळूहळु सुटू लागला. मी एकदम बुराला ओरडलो, 'ए मूर्खा गप बस बघू !' पण त्याला गप बसवत नव्हते. त्याची ती बडबड तशीच चालू राहिली.

नदीच्या पात्रात एक काळवीट जोरात खाकरला

व्हँक...व्हँक...उंक...उंक...धाक्

प्रत्येक ओरडण्यामध्ये एकदोन सेकदाचा काळ. त्याच्या ओरडण्यावरून त्याने वाघाला पाहिले तरी असावे किंवा त्याचा त्याला वास तरी लागला असावा, हे स्पष्ट होत होते. आणखी एका मिनिटाने एका हत्तीने आपली तुतारी फुकली. त्याच्या आवाजात भीती व द्वेष या दोहोचेही मिश्रण प्रतीत होत होते. तो ओरडल्यानतर कळपातील पिलेही चित्कारली. व आपल्या आईच्या भल्या मोठ्या पोटाखाली लपावयास धावपळू लागली.

वाघ आपल्या भोवती वर्तुळाकार फिरत होता. काही यार्डाच्या अतरावर मानवप्राणी आहेत हे त्याला माहीत होते पण शेकोटीतल्या विस्तवामुळे जवळ येऊन पहाण्याचे धाडस त्याच्याच्याने होत नव्हते.

नतर मग साबर ज्या दिशेने ओरडले त्याच दिशेकडून खोल, लावलचक कर्कश भीतीग्रस्त अशी किंकाळी ऐकू आली. वास्तविक साबर सतत सावध असते. पण यावेळी गफलत झाली. वाघाकडून ते मारले जात होते.

नतर शांतता. हत्तीचा कळप आपल्या पिलांना सभाळीत, त्याना जवळ घेत, वाघाचा हल्ला होऊ नये म्हणून जीव मुठीत धरून हळूच तेथून सरकला. नतरचा मध्यरात्रीपर्यंतचा काळ अक्षरश: जीवघेणा असा गेला. मध्यरात्रीनतर चंद्रोदय झाला. आजूबाजूची झाडी, नदीचा काठ यावर असलेले अधाराचे घनदाट आवरण दूर झाले. जमिनीवर झाडाझुडपातून चादोबाचे चदेरी कवडसे इतस्तत विखुरले होते. त्यामुळे अधाराची तीव्रता बरीच कमी झाली होती. इकडचे तिकडचे थोडे फार दिसू लागले होते. *शिवाय वाघाचेही अस्तित्व आता* कोठे दिसत नव्हते. बरा व मी जरा निवात झालो होतो.

पण बुरावर विसबून झोपून जाण्याची मात्र सोय नव्हती. तसा तो अजूनही घाबरलेलाच होता. त्यामुळे रात्रभर मलाच जागे रहावे लागले. नदीच्या पाण्याचा अखड खळखळाट चालला होता व त्याने मला सारखी डुलकी येत होती. मोठ्या कष्टाने मान जोरजोरात हालवून मी जागा रहाण्याचा प्रयत्न करीत होतो.

चद्रप्रकाश अजूनही रेंगाळत होता. एका रानकोबड्याला वाटले की पहाटच झाली आणि म्हणून तो मोठ्याने आरवला. पण एकदाच. त्याची त्यालाच लाज वाटली की काय कोण जाणे. पण नतर मात्र तो शात बसला.

मग खरी पहाट झाली. जगलचे सर्वच प्राणी उषादेवीच्या स्वागतासाठी गाऊ लागले. पहाटेच्या त्या पहिल्या प्रकाश सौंदर्याचे वर्णन करणे अशक्य आहे. पलीकडील दरीतील मोर केकाऊ लागले. पाणथळ जागेतल्या सायाळू भाडखोर आवाजात

ओरडू लागल्या. झाडाच्या उंच शेंड्यावर बसून, काळा पाढरा दयाळ पक्षी मोठ्या आनदाने, घरट्यात अडे उबवीत असलेल्या मादीला आपले गाणे ऐकवू लागला. हजारो बुलबुल पख फडफडवीत निरनिराळे विचित्र आवाज काढू लागले.

पूर्वेकडील आकाशात पाढर फटफटू लागले. सुरुवातीस नुसताच हिरवट रग पसरला. नतर उगवत्या सूर्याची किरणे ढगावर पडून निरनिराळ्या रगाची उधळणच होऊ लागली. विविध छटाचा जाभळा रंग, त्याखाली गडद निळा, नतर लावलचक असा फिकट निळा व आणखी त्याखाली हिरवा असे पट्टे दिसू लागले. क्षितिजावर झाडीची जी रेषा दिसत होती ती हळू हळू पिवळी व्हावयास लागली, पण नारिंगी व नतर लालभडक झाली.

हा रगाचा मनोहर खेळ थोडा वेळच चालू होता. तो सपतो न सपतो तोच झाडाच्या शेंड्यावर एकदम प्रकाशाचा गोळा दिसला... सूर्य. ओऽऽहो !

दिवस उजाडला !

मला भयकर झोप येत होती. ती रात्र फुकटच गेली. काहीही करता आले नाही म्हणून माझ्यावरच मी रागावलो होतो. पण अशी विचित्र गोष्ट व त्यापाठोपाठ त्यातील वाघाची डरकाळी ऐकू येईल हे कोणास माहीत होते ? मात्र माझे भाडण वाघाशी नव्हते. माझ्यावरच व जगलातील त्या साध्यासुध्या गरिबाना छळणाऱ्या त्या साधूवर मात्र मी निश्चितच रागावलो होतो. शक्यतितक्या लवकर त्या गोसावड्याला त्याच्या झोपडीतच गाठून खडसावयाचे असे मी ठरविले.

उटकमडहून येताना सॅटसेलनी सँडविचेस दिली होती. चहावरोबर ती खात असताना बुराला मी स्वच्छ सागितले की अशा गोष्टीवर विश्वास ठेवणे म्हणजे शुद्ध गाढवपणा आहे. थोड्याच दिवसात हा साधू कसा ढोंगी-लबाड आहे हे मी दाखवणार आहे. यावर बुराने शातपणे उत्तर दिले.

'दोराई, आतापर्यंत त्या पवित्र वाघाकडून आपल्याकडील एकजणच मारला जाणार होता, आणि तो मी होतो. आता हे शब्द तुम्ही उच्चारलेत व आता दोघे मारले जाणार आहेत. व ते दुसरे तुम्ही आहात.'

मला आणखी राग आला.

सकाळी सात वाजताच साधूच्या झोपडीवर गेलो. दरवाजा बद होता. बुरा माझ्यामागे अत्यंत ओशाळा होऊन उभा होता. मी उद्धटपणाने मोठ्याने साधूला हाक मारली.

'अहो व्याघ्रस्वामी. उठा. आपल्या रात्रीच्या भ्रमन्तीनंतर जागे असाल तर दार उघडा आता.'

माझी तो जणू वाटच पहात होता. त्याने ताबडतोब झोपडीचे दार उघडले. साधू भगव्या वस्त्रात होता. गळ्यात मोठ्या स्फटिकांची एक माळ होती. चेहरा साधारण उभट गोलाकार, काळ्याकुट्ट दाढीने व भल्यामोठ्या मिशांनी तो अधिकच उग्र दिसत होता. चेहऱ्यावरून तो कमालीचा बुद्धिमान व दृढनिश्चयी दिसत होता.

माझ्या या प्रश्नावर साधू रागावला नाही. थोड्याशा खुशीतच म्हणाला, 'मित्रा, आताच जागा झालो. तुझ्यामागे उभा असलेल्या त्या कोल्ह्याने, सर्व गोष्टी सागितल्यावर, गोरा माणूस मला भेटावयास येणार हे मला माहीतच होते. रात्री नदीच्या काठी शेकोटीवर मी तुम्हाला पाहिले होते. त्याचवेळी तुम्हापैकी एकाला खावयाचा विचार होता. पण वाटेतला काळवीट काही लवकर जाईना तेव्हा तुम्हाऐवजी मी त्यालाच मटकावले.'

मी गार पडलो. रात्रीच्या त्या भीषण नाटकात याने भाग घेतल्यागतच हा बोलत होता. यामध्ये काहीतरी गडबड असली पाहिजे याची मला खात्री होती. कोठल्याही मानवी व्यक्तीचे जनावरात रूपातर होऊन पुन्हा मानवात रूपांतर होणे हे अशक्य आहे. अर्थात अशा तऱ्हेच्या हकीगती आदिवासीमध्ये किंवा आफ्रिकेमध्ये घडलेल्या मी ऐकल्या होत्या. पण प्रत्यक्ष प्रसग हा प्रथमच समोर आला होता.

मी साधूला जरा दमातच घ्यावयाचे ठरविले. मी आवाज चढविला.

'अरे ढोंग्या, लबाडा, तुझ्या मूर्खपणाच्या भाकडकथानी या साध्याभोळ्या इरीलावर खूप परिणाम होत असेल. पण माझ्यावर त्याचा काहीही परिणाम होणार नाही. या साध्या, प्रामाणिक लोकाचे इतके खाल्लेस आणि त्याच्या उपकाराची फेड, अरे हरामखोरा तू अशा तऱ्हेने करतोस काय ? नीट ऐक, काल रात्री फिरत असलेला वाघ हे एकटे उमदे जनावर आहे. तू...तू निव्वळ डुक्कर आहेस डुक्कर !'

तो हसला, "शिकारी एवढा का रागावला बुवा ! त्याला काहीही करता येत नाही म्हणूनच ना ?"

त्याच्या चेहऱ्यावरचे भाव एकदम बदलले. कपाळावर आठ्याचे जाळे पसरले. व धमकीच्या स्वरात म्हणाला,

"गोऱ्या माणसा, तू या भानगडीत पडू नकोस. तुला यातले काहीही कळत नाही व तुझा काहीही सबध नाही. आपले नाक उगीच खुपसू नकोस. आणि तसे केलेस तर नाहक जीव गमावशील. हा या साधूचा शब्द आहे. ध्यानात ठेव."

तेथल्या तेथे अक्षरश त्याला बुकलून काढावे असे मला वाटले. पण याच्यावर सर्व लोकाची श्रद्धा आहे. त्याला ते पवित्र वगैरे समजतात. व असे काही मी केले तर मलाच त्रास होईल, हे वेळीच माझ्या लक्षात आले. तेव्हा मी त्याला म्हणालो.

"अरे, जा. मी तुझ्या भानगडीत पडणारच आहे. आणि ढोंग्या लक्षात ठेव, ज्यावेळेस तू ते वाघाचे रूप घेशील ना, तेव्हा माझ्या रायफलपुढे न येण्याची काळजी घे. तसे केलेस तर मी तुला अगदी नक्कीच ठार मारीन."

"किंवा मी तुला ठार करीन. साधू मध्येच उत्तरला. व त्याने माझ्या तोडावर धाडकन दार लावून घेतले. मी परतलो.

झोपडीच्या इतस्तत. अर्ध्या फर्लांगावर पसरलेले वाघाच्या पावलांचे अनेक ठसे बुराने येताना मला हळूच दाखवले.

नदीकाठच्या आमच्या त्या आब्याच्या झाडाखाली आम्ही परतलो. अथरूण पसरून थोडी झोप घेण्याचा प्रयत्न केला. पण झोप नीट येत नव्हती. एकदा वाघ व नतर त्याला साधूचे तोड असे काहीतरी स्वप्न पडत होते.

उत्तरार्ध पुढील अंकी

पुस्तके

## खेड्यातील श्रमिकांसाठी

कुश

श्री. अशोक मनोहर हे शहादे भागातील आदिवासीत श्रमिक संघटनेचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून काम करतात. आदिवासी तरुणांची संघटना करणे व विविध लढ्यासाठी त्यांना तयार करणे हे कार्य करीत असताना श्रमिकाचे सर्व लढे हे एका मोठ्या राजकीय लढ्याचा भाग आहेत याची जाणीव त्याना देणे आवश्यक असते. अशा जाणिवेच्या अभावी त्याचे लढे संकुचित व प्रासंगिक बनतात. त्यादृष्टीने लेनिन यांच्या 'टू दि रूरल पुअर' या पुस्तिकेचा आधार घेऊन लेखकाने ही पुस्तिका तयार केली आहे. लेनिन याची मूळ पुस्तिका मे १९०३ मध्ये प्रसिद्ध झाली होती. या पुस्तिकेचे केवळ भाषांतर न करता भारतीय परिस्थितीनुरूप तिला योग्य वळण लेखकाने दिले आहे.

या देशातील बहुसंख्य जनता अत्यंत गरीब आहे आणि या गरिबीचे मूलभूत कारण भांडवलशाही हे आहे. भांडवलशाहीत संपत्ती उत्पादन करणारा कामगार अखेरीस गरीबच राहतो. या कामगाराला भांडवलशाहीचे सारे कावे अवगत असतात आणि भांडवलशाहीत त्याच्याजवळ श्रमशक्तीशिवाय काहीच नसल्यामुळे ती गेल्यानंतर आपले नुकसान होईल अशी भीती त्याला नसते. हा वर्गच अखेरीस क्रांतीचा अग्रदूत बनतो.

शेतकऱ्यानी आपले दैन्य जाण्यासाठी या वर्गाबरोबर हातमिळवणी केली पाहिजे. लेखकाने खेड्यातील जमीनदारवर्ग व सधन शेतकरी लहान शेतकऱ्यांना व शेतमजुराना कसे लुबाडतात याचे सविस्तर वर्णन केले आहे. शेतमजुरांनी मध्यम शेतकरीवर्ग हा आपला निश्चित शत्रू न मानता त्याला आपल्याबरोबर ओढून घेतले पाहिजे व शेतमजूर, गरीब शेतकरी आणि मध्यम शेतकरी अशी युती करून आपले दैन्य घालवले पाहिजे. लहान शेतकऱ्यांची आणि शेतमजुराची प्रचंड पिळवणूक, संघटना बांधून लढा दिल्याखेरीज नष्ट करता येणार नाही. कारखान्यातला असो वा शेतीतला असो, नफा हा श्रमशक्तीतून निर्माण होतो. उत्पादन साधनांची खासगी मालकी नष्ट करून त्यावर साऱ्या कष्टकऱ्यांची मालकी प्रस्थापित झाली पाहिजे. भारतातील सध्याचे राज्य हे कष्टकऱ्याचे नाही. आजचे कायदे माणसाच्या आयुष्यापेक्षा खासगी मालकीला जास्त महत्त्व देतात. कागदावर असलेल्या स्वातंत्र्याचा कष्टकऱ्याला काही उपयोग होत नाही. एकजूट आणि लढा या मार्गानेच क्रांती होऊ शकेल. हे सर्व म्हणणे लेखकाने अतिशय सोप्या भाषेत उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे. मात्र या पुस्तकात जातीव्यवस्थेविषयी, लोकाच्या अंधश्रद्धाविषयी काही लिहिले असते तर ते अधिक उपयुक्त झाले असते.

भारतातील खेड्यात एक नवा अल्पशिक्षित समाज निर्माण होत आहे. त्याना त्यांच्या प्रश्नाची जाणीव करून देणे हे महत्त्वाचे कार्य आहे. त्यासाठी खेड्यात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना विविध विषयावर सोप्या शब्दात लिहिलेल्या पुस्तिका तयार केल्या पाहिजेत. मागोवा मंडळाने हे कार्य केल्यास फार बरे होईल. मात्र या पुस्तिका शक्यतो स्वतंत्र लिहिलेल्या असाव्यात. श्री. अशोक मनोहर याचा हा प्रयत्न अतिशय चांगला व अनुकरणीय आहे. ¤

**खेड्यातील श्रमिकांनो,**
लेखक : अशोक मनोहर.
मागोवा प्रकाशन, पुणे.
किंमत : पन्नास पैसे


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे

किंमत सात रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

## पुन्हा एकदा आविष्कारस्वातंत्र्य...

## महेश एलकुंचवारांचे

# वासनाकाण्ड कपाटात बंद ?

पुन्हा एकदा 'रगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मडळा 'ने आपला बडगा उचलला आहे. 'अनिकेत' या सस्थेच्या वतीने श्री. अमोल पालेकर यांनी 'वासनाकाण्ड' या महेश एलकुंचवाराच्या नाटकाचा प्रयोग करण्यासाठी मागितलेली परवानगी नाकारण्यात आली आहे.

या परवानगी नाकारणाऱ्या मडळाचे अभिधान आहे . रगभूमी प्रयोग परिनिरीक्षक मंडळ.

आता हे जे प्रयोग परिनिरीक्षण मडळ आहे त्याने प्रयोग न पाहाताच त्यावरचा आपला निर्णय जाहीर केला आहे. नाटक हा कलात्मक घाटच असा आहे की, प्रयोगस्वरुपात तो पूर्ण होतो. प्रयोगस्वरुपात नाटक अनुभवल्याशिवाय कोणतेही नाटक आपल्याला खऱ्या अर्थाने कळत नाही. प्रस्तुत निर्णय 'वासनाकाण्ड' या पुस्तकाच्या छपाईवर बदी आणू शकत नाही. पण सहितारूपात नाटक वाचून प्रयोग वद करू शकतो. हा प्रयोगाला परवानगी नाकारण्याचा प्रकार म्हणजे एखाद्या सगीतरचनाकाराला 'तू चीज बाध पण तोंडातून स्वर उमटू देऊ नकोस,' असे सागण्यासारखा आहे एखाद्या रगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मडळाने प्रयोगपूर्व निर्णय घेणे अप्रस्तुत आणि स्वतःच्याच अस्तित्वाला धोक्यात आणण्यासारखे नाही काय ?

हा निर्णय घेतला गेला तो कोणत्या सबबीवर—तर महाराष्ट्रात प्रचलित असणाऱ्या नीतिकल्पनाना धक्का देणारे असे बहीणभावाचे सबध या नाटकात आहेत. वर्तमानपत्रातल्या बातमीवरून ग्रह असा होतो की, 'वासनाकाण्ड' हे नाटक Encest वर—निषिद्ध नातेसबंधावरच—आधारित आहे. हेही खरे नाही. 'वासनाकाण्ड' नाटकाची अनुभवाकृती भाऊबहिणीच्या संबधावर उभी नसून तो एक कथावस्तुरचनेतील महत्त्वाचा दुवा आहे. 'वासनाकाण्ड' नाटक दूरान्वयानेही वास्तवदर्शी वा वास्तववादी नाही. या नाटकाची जात दुःस्वप्नासारखी अधिक आहे. या नाट्यानुभवाचा आविष्कार काव्यभाषेत झालेला असल्यामुळे संपूर्ण अनुभवाचाच अमूर्त अनुभवाचे गहनरूप प्राप्त झाले आहे. एवच, अशा नाटयकृतीच्या चांगलेवाईटपणाची चर्चा करण्यापूर्वी ती एक गभीर कलाकृती आहे हे मान्य करावे लागते आणि कोणत्याही गभीर कलाकृतीतला एक घटक सपूर्णाकृतीतून वेगळा उपसून त्याविषयी विचार करणे अतार्किक असते हे मडळाच्या विद्वान सभासदाना सांगावयाला नकोच. एकच घटक वेगवेगळ्या कलाकृतीमध्ये वेगळे स्वरूप धारण करू शकतो. पिवळ्या वेष्टनातील पुस्तकावरील नग्न चित्र आणि ग्रीक नग्न पुतळा या दोहोतील नग्नतेची तुलना होऊच शकत नाही. कारण ती नग्नता एकच नसते. ग्रीक पुतळ्यातील नग्नता सौदर्याचा—निरामयतेचा साक्षात्कार देते तर मुखपृष्ठावरील नग्नता चित्तात चलविचल निर्माण करते. तसेच कलाकृतीतील गुन्ह्याचे आहे. गुन्हेगारी कथेतही खून—मुडदे असतात आणि शेक्सपियरच्या शोकात्मिकेतही असतात—त्याना एका मापाने मोजण्याची चूक सामान्य रसिकही करणार नाही. कारण कोणत्याही गभीर कलाकृतीत प्रत्यक्ष जीवनाचे येणारे चित्र हे अनुभववाहक असते; इतरत्र ते केवळ प्रतिबिब असते.

एका विशिष्ट नाटककाराच्या नाटकातील अनुभवाचे विश्लेषण करताना त्या नाटककाराच्या इतर नाटयकृतीचा विचार आपल्याला योग्य दिग्दर्शन करू शकतो. महेश एलकुचवाराच्या 'यातनाघर', 'गार्बो' आणि 'वासनाकाण्ड' यांचा एकत्र विचार करता अनुभवाचे आवर्त पुरे झालेले दिसतात. या तिन्ही कृतीत बद दरवाजाआत स्वतःचा नरक ज्यांनी स्वतः निर्माण केला आहे अशा वृत्तीचा अनुभव आहे. ही सारी शापित जीवने आहेत. 'वासनाकाण्ड' तर शापित वास्तूत—शापाच्या सावलीत उभे राहते. जिवाला ग्रासणारी मूलभूत अपराधाची जाणीवही या नाटकात तीव्र आहे. या सखोल अर्थाने ती नीतिकथा आहे. या नाटकातील हेमकात शिल्पकार आहे. ललिताचे मेलेले मूल, हेमच्या शिल्पाचे हरवलेले निरागसत्व, यातून नाटककाराने अनुभवाचा गाभ्यासह स्वीकार—की केवळ पार्थिव अनुभव, जीवनानुभव—आयुष्य आणि नवनिर्मिती, यात काही नवा अन्वय शोधण्याचा यत्न केला आहे. जो न्याय आज आमचे प्रयोगनिरीक्षण मडळ महेश एलकुचवारांच्या कृतीस लावीत आहेत तो न्याय तुकारामकृत स्त्रीवर्णनाला लावायचा झाल्यास काय होईल ?

भयं—भयावहता हा ज्या नाटयकृतीचा स्थायीभाव आहे त्यात अश्लीलता येणारच कशी ?

आता ज्या परिनिरीक्षण मंडळाने महाराष्ट्राच्या जनतेला अनीतीपासून वाचविण्याची जबाबदारी पत्करली आहे—ते मडळ काय करीत आहे ? एलकुचवार वा तेंडुलकर वा खानोलकर याच्या नाटयप्रयोगाना येणारा प्रेक्षकवर्ग अल्प व प्रगल्भ असतो. कलाकृतीचे अनिष्ट परिणाम त्याच्यावर होणार नाहीत असा रसवेत्ता असतो. परतु महाराष्ट्र सरकारच्या कृपेने सेन्सॉरद्वारा प्रसिद्धी मिळाली की नेमका चुकीचा प्रेक्षकवर्ग चुकीच्या कारणासाठी अशा नाटकाला येतो. या अशा नव्या नवशिक्या प्रेक्षकावर काही अनिष्ट परिणाम झाले तर त्याला जबाबदार दिग्दर्शक की सरकारी यत्रणा ?

कोणतेही स्वातत्र्य मिळविताना धोका पत्करावा लागतोच. लहान मुलाना रस्ता ओलांडण्याचे स्वातत्र्य देताना अपघाताचा धोका आपण पत्करतो; वाहनाना रस्त्यावर चालण्याची वदी करीत नाही. असो.

तर 'सखाराम बाईंडर 'विषयी जी चळवळ उभी केली होती ती त्या नाटकापुरती यशस्वी झाली होती हे खरे असले तरी पुन्हा एकदा कलावताच्या आविष्कारस्वातत्र्याचा प्रश्न तडीला लावणे अगत्याचे झाले आहे.

एखाद्या दिग्दर्शकाला नाटयनिर्मितीचा विचार करण्याऐवजी कोर्टे—कचेऱ्या करण्यात वेळ घालवावा लागला, त्याची उमेद जर खचली तर मराठी रगभूमी मागासणार आहे. ज्या आजच्या युगात आपण क्षणन् क्षण वापरण्याचा यत्न करतो तेथे एका कलावताचे तास फुकट दवडण्याचा नैतिक अधिकार आपल्याला पोचतो काय ? मर्ढेकरांसारख्या प्रतिभावताला अशाच यंत्रणेने गाजले होते. पण अनेक कॅलेंडरे बदलली तरी आपण काही आपली असहिष्णु वृत्ती बदलीत नाही.

कोणाची धार्मिक भावना दुखावते : नाटयप्रयोगावर बदी येते.

कोणाचा जमातीविषयीचा अभिमान दुखावतो : नाटयप्रयोगावर बदी येते.

कोणा स्वत क्रातिकारक असणाऱ्याच्या देवाला हार पत्करावी लागते : नाटकाचे शीर्षक बदलते.

कोणाची नीती तडकू लागते : नाटकांवर बदी येते.

हे असे, किती आणि कुठवर चालायचे ? या साऱ्यांच्या श्रद्धा स्वत सिद्ध बळकट होणार कधी आणि कलावताला अविष्कार स्वातत्र्य लाभणार कधी ?

याचा सूज्ञ विचार करतील का ?

— पुष्पा भावे

सत्यचित्र

# रोटी, कपडा, मकान और ट्रक

।। नजर ।। ह. शि. खरात ।।

'आई, मी शाळेत जातो ग !'

'मेल्या शाळेत काय जातोस, मग रेशनच्या लायनीला उभे राहणार कोण ?'

'कालच शाळा बुडवून मी रॉकेल आणलेय.'

'मग उपकार केले नाहीस मेल्या माझ्यावर ! घासलेट आणले नसते तर ह्रादडायला मिळाले असते का ?'

'अग पण आज १५ ऑगस्ट ! झेंडावदन...'

'मेल्या तिकड झेडावदनाला जाशील अन् सध्याकाळी काय खाशील.'

ह्या सवादाने ह्या भव्य सत्य-चित्रपटाची सुरुवात होते. तसा हा चित्रपट खरोखरच प्रचड. व्हिस्टा व्हिजन ! म्हणजे जनतास्कोप माझ्यासारख्याची नजर फाटून जाते हे चित्र बघताना. हे चित्र इतके वास्तव अन् सरळ घेतले आहे की आपणही त्यातच वावरतो आहोत–नव्हे त्याचाच एक भाग आहोत असे वाटू लागते. ह्या चित्रपटातील काही शॉटस् इतके जिवंत वाटतात की एखाद्या फिल्मी चित्रात ते चुकूनही आढळणार नाहीत. अशी एखादी घटना घडते की टचकन् डोळ्यात पाणी यावे, तर कधी डोळ्यातील चीड अग्नी होऊन फुलावी कधी नजरेलाच भोवळ यावी तर कधी वैतागाने वेड लागायची पाळी यावी. परतु ह्या चित्रपटातील काही प्रसग रोज रोज तेच बघावे लागल्याने माणसाची नजर मरते. तिची सवेदनक्षमता कमी होते. अन् 'रोज मरे त्याला कोण रडे' असे होऊन जाते. आणि असे मुर्दाड प्रसग अन् मुर्दाड माणसेही बघावी लागतात. ही माणसे चालतात, बोलतात एवढेच. बाकी जिवतपणा आढळत नाही. मग वाटते ही माणस पेटून का उठत नाहीत ?

तशी ह्या सत्यचित्राची कथा अगदी साधी – रोजची म्हटले तरी चालेल. माणसाच्या पोटापाण्याची ही कथा, पण आतड्याला पीळ पाडून जाते. तशी म्हटले तर ही सनातन कथा. अगदी चाकोरीतील. पुरानी. परतु काळानुसार ही कथा अशी घडतेय की तिला तोड नाही. माणसाच्या भाकरीची, त्याच्या वस्त्राची, त्याच्या निवाऱ्याची ही कथा. माणसाच्या मूलभूत गरजातून निर्माण झालेली. पोटभर भाकरी मिळावी, अगभर ल्यायला मिळावे, देह टेकायला कुठेतरी निवारा असावा. अशा साध्या गोष्टीची ही कथा. १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीपासून ही सुरू होते. परंतु तिला खरा रंग किंवा वेगळेच परिणाम सुरू होतात १५ ऑगस्ट १९४७ नतर. तसे पाहिले तर १५ ऑगस्ट १९४७ आधीचा भाग आपण बहुतेक विसरून गेलो आहोत. कारण १५ ऑगस्ट १९४७ नतर एक वेगळीच हवा सुरू झाली. स्वातत्र्य ! अहाहा ! एक पॉप सिंगर म्हणाला, एकाच वेळी आपण आई अन् मूल आहोत असे वाटावे असे स्वातत्र्य ! अशा ह्या स्वातत्र्याच्या वाऱ्यात आपल्याला स्वर्ग दोन बोटे उरला होता. मग नुसती रोटी, कपडा, मकानच काय, आता 'रामराज्यच' येणार असे वाटले आणि अचानक ह्या रोटी, कपडा, मकानच्या कथेला वेगळीच कलाटणी मिळते अन् हा सत्य-चित्रपट अधिकच माणसाची पकड घेऊ लागतो.

मध्येच दोन युद्धे पेटतात. तशा आत अनेक लढाया चाललेल्या असतात. पण युद्धपातळीवर 'हम सब एक है' होतो. युद्ध सपले की तू अमक्या जातीचा, हा तमक्या जातीचा युद्धात खालच्या जातीचा लढतो – मरतो पण युद्ध सपले की समाजात त्याला कुत्राही शिवून घेत नाही. तरी पण तो देशासाठी लढतो. कुणाच्या देशासाठी कुणास ठाऊक ? एक युद्ध हरतो. एक युद्ध जिंकतो. तरीसुद्धा 'राष्ट्र' ही कल्पना कुणाच्यातच बसत नाही. आपला एक देश आहे, एक राष्ट्र आहे. आपण एक आहोत हे कुणालाही अनुभवयाला मिळत नाही. लोकशाहीच्या ॲंगल्समधून हा सारा चित्रपट चित्रित केला जातोय, पण जिथे आम्हाला स्वातत्र्याचा अर्थ कळत नाही, तिथे लोकशाहीचा कसा कळणार. निवडणुकांचे चित्रण तसे भयकर दाखवलेय. लोकशाहीच्या नावाने गजर. परतु जातवार उमेदवार उभे. इतराना जातीयवादी शिव्या द्यावयाच्या अन् आपल्या उमेदवार मतदारसघाची जात बघून आपला उमेदवार ठरवायचा. म्हणजे हे लोकशाहीचे विडंबन छान जमलेय. ही लोकशाही नसून जातशाही आहे हे जाणवण्याइतपत. तसे पाहिले तर ह्या देशात कोणताही 'इझम' आला की तो जातीवर जातोच.

पुढे दुष्काळाचे चित्रण. भयकर दुष्काळ. कधी ओले दुष्काळ तर कधी कोरडे. काही दुष्काळ माणसेच निर्माण करतात नि मग टचाई की दुष्काळ हेच कळत नाही. माणसे तडफडून मरावीत असा दुष्काळ. जनावरे चाऱ्याविना मरतात, बैल कोबडीच्या भावाने विकले जातात. गाई भाकड होतात, पण गाई बाचवतो कोण ? मध्येच काही साधू नागडे होऊन नाचतात–गाईला वाचवायला. हा प्रसग थोडा विनोदी वाटतो. पण दुष्काळातील खेडेगावचे चित्रण भेसूर अन् भयकर आहे. माणसाना स्वातत्र्य हवे रोटी, कपडा, मकान हवे. पण दुष्काळ येतो, निसर्गाचे नाव केले जाते. अन् तुम्हाला स्वातंत्र्य हवे ना, मग फोडा खडी. दुष्काळात

पोटासाठी बायकामुलांना खडी फोडायची सक्तमजुरी. गुन्हा काय ! तर स्वातंत्र्य हवे ना ! खडी फोडायची. पण मजूरी मुकादमच खाणार. त्यात पुन्हा बायकावर अत्याचार. किळस येणारे हे प्रसग. भुकेपोटी घराबाहेर पडणाऱ्या स्त्री ची स्वातंत्र्यात अशी निर्घृण विटबना ! हे शॉटस काहीच नाहीत. हरिजनांवरील अत्याचाराचे शॉटस भलतेच जिवत ! बायकांना नागड्या करून त्यांची धिंड काढणे—त्यांच्या नवऱ्यासमोर त्यांच्यावर बलात्कार करणे—त्यांना घरात कोडून जिवत जाळणे—गावाबाहेर वाळीत टाकणे. हे नागड्या हरिजन बायकाचे शॉटस मुद्दामहून सेक्ससाठी घेतलेत असे वाटत नाही. वास्तव अन अटळ असेच हे चित्रण आहे. परंतु चित्रपटात 'सेक्स' चवीने बघणाऱ्यांना ते चविष्ट वाटतील.

अर्थात सारीच माणसे मुर्दाड दाखविली नाहीत. काहीजण खरोखरीच पेटून उठतात. बायका मोर्चे वाढतात. मोर्चे ही बाब तर रोजची झालीय. त्यामुळे भाड्याचा मोर्चा कोणता अन खरा मोर्चा कोणता हे कळत नाही. परतु भिकाऱ्यांपासून डॉक्टर पर्यंत सगळे रस्त्यावर येतात. मोर्चे काढतात. आपला हक्क बजावतात. सप घडतात. हरताळ पडतात. अनेक प्रकारचे 'बंद' होतात. उपोषणे होतात. लाठीमार होतो, जाळपोळ घडते, गोळीबार होतो अन मोर्चात नसलेले लोक बळी पडतात. उदाहरणार्थ गॅलरीत उभा राहिलेला मुलगा मरतो किंवा पातळ वाळत घालणारी बाई गोळी खाते. अर्थात बदुकीची. परतु ह्या सर्व बंदच्या चित्रणात रेल्वे बदचे चित्रण अप्रतिम झालेय. न भूतो न भविष्यति असा हा रेल्वेबंद, रेलका चक्का जाम होतो. लोक हैराण होतात. मिळेल त्या साधनाने नाहीतर पायी जातात. कारण पोट ! वस्त्र आणि मकान, ह्या साध्या गोष्टीसाठी जिवाचे हाल करून जातात. आणि इथ त्याच्या मदतीला येतो ट्रक. श्रीमत आपल्या गाड्यातून एक एकटे जातात. एखादी सुदर श्रीमत छोकरी आपली कॅडिलॉक चालवीत जाते, परतु ट्रकमध्ये खच्चून भरलेल्या पाढरपेशी पोरीकडे मिश्किल नजरेने बघते. त्यातील एखादी पोरगी 'ही गाडी अडवाग' असेही हळूच म्हणते. माणसाला काय वाटेल ते करावे लागते. मेंढरासारखे ट्रकमधून जावे लागते. बसेसची अवस्था लोकलसारखी होते. बसेसच्या टपावर सुद्धा लोक बसून गेले असते. परंतु आर. टी. ओ ह्या सेन्सॉरने तो भाग कापला, मध्येच फ्लॅशबॅक होतो. २६ जानेवारीची रोषणाई दाखवली जाते. तेथे मोठ्या आनंदाने लोक पिपाण्या वाजवीत ट्रक भरभरून रोषणाई बघतात. ट्रकमधून रोषणाई पाहणे एवढा ट्रकचा उपयोग. पण पुढे पोटासाठी ट्रकमधून लोक जातात. पण चेहऱ्यावर रोषणाईचा आनद नसतो. कुणाला तरी शिव्या दिल्या जातात.

त्यातला एक ट्रक खच्चून भरलेला बांद्र्याजवळच्या खड्ड्यात कोसळतो. पण इथे दिग्दर्शकाचे कौतुक करावयास हवे. जो ट्रकचा अपघात होतो तो सरळ उच खाबावर लावलेल्या भल्या मोठ्या जाहिरातीचा चकनाचूर करून. ती जाहिरात असते पुन्हा एका चित्रपटाची. चित्रपटाचे नाव असते 'रोटी, कपडा और मकान.' बाजूच्या दुसऱ्या ट्रकमधला एकजण ओरडतो. रेल्वेबदीने हमको क्या दिया. ट्रक दिया ! ट्रकही हमारे गरीबोको मदत करेगा. बस, आजसे हमारी माँग ये रहेगी. आजसे हमको 'रोटी,

## समजतच नाही

या मातीशी इमान राखून आहोत आम्हीही
देशासगे अद्याप दुष्मनी केली नाही.
तरीही नागवलो गेलोत, लुबाडलोत.
दोन वेळचे अन्न, धडूतकपडा
अजूनही मिळवते झालो नाही.
डोळ्यावर स्वप्न होती. तडातड् फुटली
अशा काचा...
भराभर रग बदलले (केवढा चमत्कार !)
या खेड्यांचे आणि गावांचे नि शहराचे.
आम्ही रस्त्यालगतच हरवलोत
स्वतःच्या नकळत.
घर असे कुठेच का गवसले नाही ?
आदळआपट करावी अन् शिव्या द्याव्या.
वळलेल्या मुठी
खिशातच गुमान ठेवून द्याव्यात.
असं कसं घडतय् ?
समजतच नाही.
आमच्याच मतांची (?)
लूत चढलेली ही 'लोकशाही'
स्वतत्रपणे फक्त भुकतो आहोत प्रत्येकजण
कुणीच कसे चूड होऊन आग लावीत नाही ?
खऱ्यानेच सांगतो बाप्पा !
आता तुमच्याबद्दलचाच राग
डोळ्यात मावत नाही...

— मधुश्री

कपडा, मकान और ट्रक' मगताय. इथे मला दिग्दर्शक दिसला. ट्रकचा योग्य ठिकाणी अपघात दाखवून सगळ्या वाहतूकबदीवरचा उपाय ट्रक आहे हे सुचवून रोटी, कपडा, मकान और ट्रक हेच आता स्वातत्र्यदिनी आमचे मागणे आहे. हे फार परिणामरीत्या दाखविले गेले. मध्येच एखादा कवी स्वातत्र्य ! ठे स्वातत्र्य ! म्हणत आपली व्यथा रस्त्यावरील वेड्यासारखी व्यक्त करीत जातो.

अशी ही रोटी, मकान, कपडा और ट्रक ही कथा म्हणजे स्वातंत्र्याची चित्तरकथा. असे का झाले? १५ ऑगस्ट १९४७. स्वातत्र्य आले पण सुराज्य आले नाही. साऱ्याचाच दारुण अपेक्षाभंग. ज्यानी स्वातत्र्य मिळाल्यावर रामराज्याची स्वप्ने पाहिली त्याना ह्या देशात 'राम' म्हणावा लागला. काहीना तर रावण आठवला. स्वातंत्र्य मिळून २८ वर्षे झाली. पण दिवस अधिकच कठीण होताहेत. १९४६ साली जे मिळाले ते १९७४ साली नकोसे झालेय. आजही वृद्ध मडळी म्हणताहेत, 'त्यापेक्षा इग्रज बरे. दोन घास खायला तरी मिळत होते!' गुलामगिरीतील दोन घास त्यांना गोड लागावेत. अन् स्वातत्र्याच्या मोकळ्या हवेत घासभर अन्न मिळू नये. असे का झाले? आमची काय अपेक्षा होती. साधी रोटी, कपडा आणि घर. परतु त्यात पुन्हा ट्रकची भर पडली. स्वातत्र्य मिळाले. पण ज्यांनी मिळवले ते बाजूला पडले. भलत्याच लोकांनी त्याचा उपभोग घेतला. ज्याना स्वातत्र्य कशाशी खातात माहीत नव्हते ते राज्यकर्ते झाले. ते जनतेला, देशाला विसरले. स्वार्थी झाले. मग कारभारभ्रष्ट झाला, काळाबाजार वाढला, भ्रष्टाचार माजला. जातीयतेला ऊत आला. त्यामुळे काय झाले? श्रीमत गब्बर झाले. उच्च इमारती उंचच वाढल्या अन् झोपडपट्ट्या तळाशी वाढल्या. फूटपाथ भरून गेले. भिकारी वाढले.त्यानाही ह्या देशात मोर्चा काढावा लागला. लाचलुचपत वाढली. शेती कागदावरच पिकली. अनेक उद्योगधदे तोट्यात गेले. प्रगतीच्या नावाने तसा नन्नाचा पाढा नव्हता; पण ह्या देशात 'गरिबी हटाव'च्या ऐवजी गरिबी वाढली. ह्याला जबाबदार कोण? अरे, साध्या साबणासाठी लाईन लावावी लागते, तीही दिवसभर. युद्धकाळातही असे दिवस नसतात. सबध आयुष्य अशा लायनीत घालवायचे. बायको रेशनच्या, नवरा डालडाच्या, मुलगा घासलेटच्या. अरे, ज्यानी हसायचे, बागडायचे, शिकायचे त्यांना दिवसभर लायनीत. राष्ट्राचे पुढचे आधारस्तंभ कसे निर्माण होणार? लायनीतील भयंकर मनस्ताप म्हणजे अत्यंत क्रूर शिक्षा वाटते. रॉकेलसाठी दाही दिशा वणवण. नाही मिळाले तर उपाशीच झोपायचे. ह्या जनतेने आता काय काय सहन करायचे. कशासाठी सहन करायचे? स्वातंत्र्यासाठी! इथल्या अर्भकाना पुरेसे दूध मिळू नये अन् दुधाची पावडर मात्र काळ्या बाजारात विकली जावी. मग हे स्वातत्र्य कशासाठी? कुणी ही अवकळा आणली ह्या देशाला? कुठे चुकतेय? ह्याच्यावर उपाय काय? हे सारे प्रश्न ह्या चित्रपट बघताना मनात घोंगावत असतात. ह्या चित्रपटातील सहनशीलतेच्या, जनतेच्या अभिनयाला तोड नाही. इतका जिवत अभिनय मी तरी अजून पाहिला नाही. असो. रोटी, कपडा, मकान और ट्रक हा चित्रपट जेव्हा जेव्हा डोळ्यापुढून सरकू लागतो तेव्हा अनंतकुमार पाषाण ह्या हिंदी कवीच्या पुढील अनुवादित ओळी माझ्या मनाला बोचकारतात, रक्तबबाळ करतात. त्या ओळी अशा :

During the nine thousand and one twenty five nishts of there twenty five years,
The makers of Cement and Biscuits offered Awards To the makers of Rhyme.
Shoe factory–owners fasted for cow-protection,
Patriots forgot to fill incom–tax returns,
Newspapers were printed in textile mills,
Ten young scientists committed suicide,
And two more good writers joined the Grocer's shop,
And two hundred Harijans were burnt annually.
The big universities closed seventeen times,
The boys Hicked the pen of Vice chancellor in Bombay,
Aad girl was raped in Delhi University,
The Prostitutes and the Blind increased by one lakh,
And One–Eyed-man called himself a king.

□


# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये
सहामाही : वीस रुपये
परदेश : (जलमार्ग)
पंचावन रुपये

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. २४ ते ३१ ऑगस्ट ७४

### इंदिरा गांधींचा उमाशंकर दीक्षितांवर दृष्टिक्षेप

चुका करण्याची, फसलेल्या निर्णयाची जबाबदारी स्वीकारून त्यातून निर्माण झालेल्या संकट परंपरेला धैर्याने सामोरे जाण्यातच पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे सामर्थ्य आहे. या सामर्थ्यामुळेच राजकीय व शासकीय पटावरील प्यादी इकडची तिकडे व तिकडची इकडे त्या कौशल्याने हलवतात. अभ्यासू वाचकांच्या आता लक्षात येऊन चुकले असेल की एका वेळी इंदिराजींचा विश्वासू उजवा हात म्हणून स्थान मिळवलेले गृहमंत्री उमाशंकर दीक्षितजी गुजरातच्या चिमणभाई बरोबरच अस्तंगत झाल्यासारखे झाले आहेत. बिहारच्या गुंतागुंतीच्या राजकारणात ते भरघोस अपयश घेऊनच आले आहेत. हे सारे 'कर्तृत्व' इंदिराजीच्या लक्षात आलेच असेल. राजकीय निरीक्षकांना त्यांच्यावरील इंदिराजींचा 'दृष्टिक्षेप' याचवेळी लक्षात येऊ लागेल. महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब सावंत यांच्या कर्तृत्वाला उजाळा मिळेल.

**मेष** : स्थावराच्या प्रश्नाची उकल

आठव्या चंद्राने या आठवड्याची सुरूवात होत आहे ही एक समाधानकारक गोष्ट म्हणावी लागेल. तुम्हाला अकरावा गुरू असेपर्यंत कोणत्याच बाबतीत अपयश येणार नाही. हा गुरू ज्याप्रमाणे तुमची आर्थिक प्रतिष्ठा वाढवत आहे. त्याचप्रमाणे पैसा मिळवण्याच्या निरनिराळ्या प्रयत्नांना यशही देत आहे. या सप्ताहात यश सफलता याचाच अनुभव तुम्हाला येईल. अष्टमात पहिले दोन चंद्र आहे. पोटाला त्रास होण्याची शक्यता. मि. जास्त जेऊ नका. उपास करा. म्हणजे स्वार्थ व परमार्थ असे दोन्ही प्रकारचे पुण्य साधता येईल. या वेळी पैसे मिळवण्याचे अनेक मार्ग सापडतील. तुमची गरिबी हटणार एवढे निश्चित समजा. तुमचा अनेक दिवस रेंगाळत राहिलेला स्थावराचा प्रश्न यावेळी निर्णयाप्रत येईल. **महिलांस** : या आठवड्यात माहेरच्या माणसांकडून मदत मिळेल. वारस हक्काने स्थावर लाभेल.

**वृषभ** : प्रेम साफल्याचा आनंद

केतू तुमच्या राशीत असेपर्यंत तुम्हाला अडचणीतून मार्ग काढण्याशिवाय गत्यंतर नाही. मानवी जीवनात कधीना कधी प्रतिकूल परिस्थिती येतच असते. ती जशी येते तशीच निघूनही जाते. येणाऱ्या परिस्थितीला धैर्याने सामोरे जाणे, तोंड देणे हाच खरा पुरुषार्थ होय. तुमच्या कुलदेवतेने तुम्हाला हे सामर्थ्य दिले आहे. सातवा चंद्र सुरूवातीलाच तुमच्यावर कृपा करीत आहे. तुम्ही तरुण असा वा वृद्ध असा तुमच्या जीवनात अनामिक असे एखादे माणूस प्रवेश करील. त्यामुळे प्रकाश व प्रसन्नता याचे आगळे वरदान तुम्हाला लाभणार आहे. पैशाची काळजी करू नका. पैशाची अडचण भासणार नाही. नोकरी धंदा अनुकूल वळण घेईल. नोकरीत बदलीची शक्यता.

**मिथून** : खर्चाला नवे वळण

पहिले एक-दोन दिवस चंद्र प्रतिकूल आहे. चंद्राचा संबंध पचनशक्तीशी-पाण्याच्या शरिरावर होणाऱ्या बऱ्यावाईट परिणामाशी असतो. आपण जर अशक्त असाल तर बदलत्या हवामानाची दखल घेऊन तब्येतीला जपा. बारावा केतू खर्चात अनपेक्षित वाढ करणार आहे. कुणालाही जामीन राहू नका. त्याचप्रमाणे रेस, लॉटरीच्या फंदात पडलात तरी आहारी जाऊ नका. शनी राशीवर असल्यामुळे व मंगळ पराक्रमात असल्यामुळे सर्वसाधारण हा आठवडा प्रगतीत खंड पडू देणार नाही. नोकरीची परिस्थिती एकूण समाधानकारकच राहील, कामाचा ताण वाढला तरी तक्रार करू नका. आड मार्गाने पैसा घेऊ नका. लाचबाजीचा मोह होईल तो कटाक्षाने टाळा. व्यापाऱ्यांनी प्रामाणिक रहावे. चालू उद्योगात सुधारणा होईल. **महिलांस** : स्वतःचा मोठेपणा मिरवू नका. घरच्या कामात लक्ष द्या. मुलांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

**कर्क** : कुटुंबाचे नेतृत्व

शनी-मंगळाचा तेवढासा अनुकूल नसला तरी दुसरा मंगळ काही वाईट नाही. कुटुंबात होत असलेली तुमची उपेक्षा आता संपणार आहे. कुटुंब मोठे असो की छोटे असो त्याचे प्रमुखपद तुमच्याकडे आपसूख चालत येईल. पहिले दोन-तीन दिवस बुधवारपर्यंत छान आहेत. नवे काहीही करावयास हरकत नाही. लेखनाची सुरुवात, कलेच्या अभ्यासाची सुरुवात, नव्या इच्छित धंद्याचा शुभारंभ यावेळी अवश्य करा. चालू नोकरीत काही अनुकूल बदल होतील ते फायद्याचे ठरतील. पत्रकारांना आठवडा अतिशय प्रगतीचा जाईल. पैसा मिळेल पण शिल्लक पडणे नाही. तब्येतीला जपा. **महिलांस** : आठवडा काही अनुकूल घडवील. हातून धर्मकार्य व्यवस्थित पार पडेल.

**सिंह** : रवी-मंगळाचे कृपाछत्र

तुमच्या गळ्यात राजकारणाचे एखादे नवे घोंगडे या आठवड्यात पडण्याची शक्यता आहे. चंद्र-रवीचा शुभयोग, रवी-मंगळाचा शुभयोग. राजकारणात, समाजकारणात, सत्तास्थानात हे रवी-मंगळ तुमचे स्थान उंचावणार आहेत. नोकरीत एखादी महत्त्वाची खास जागा निर्माण करून तुमची नेमणूक झाल्यास आश्चर्य मानू नका. तसा आश्चर्यकारक घटना घडवणारा हा आठवडा आहे. प्रामुख्याने मंगळवार ते शुक्रवार सारे मनासारखे घडेल. एखाद्या धनिक व्यक्तीशी परिचयाचा योग जुळून येईल. वाहन घेण्याची पुष्कळ दिवसाची इच्छा आकाराला येईल. मनात जपून ठेवलेल्या महत्त्वाकांक्षा मूर्त रूप

धारण करतील. उद्योगात मात्र धाडस नको. **महिलांस :** सार्वजनिक कार्या[illegible] ोईल. स्तुती व मोठेपणाचा आठवडा आहे.

**कन्या :** अनिष्टाला उतार

व्ययस्थानच्या मंगळाची क्रूर कर्माने भरलेली कारकीर्द आता फक्त आठवडाभरच उरलेली आहे. या आठवड्यापासून त्याची उग्रतादेखील कमी कमी होऊ लागेल. तुमचे मन आणि शरीर, विचार आणि भावना याना ग्रासून टाकणारी दीर्घकाळची अनिष्टता कमी होत असल्याचा प्रत्यय येऊ लागेल. कुलदेवतेची कृपा होत असल्याचा प्रत्यय येऊ लागेल. धंदा, व्यवसाय, नोकरी, प्रतिष्ठा, सामाजिक कार्य यात झालेली अधोगती, अप्रतिष्ठा दूर होऊन नवा उत्साह निर्माण होईल. अनेक दिवस थांबलेले उद्योग, नोकरीचे मान प्रगतीच्या रूळावर येईल. तब्येत सुधारू लागेल. ज्यांनी तुमच्या संकटाचा गैरफायदा घेऊन कारस्थाने केली त्यांना पश्चाताप होईल. आर्थिक स्थिती सुधारायला अजून वाट पहायला हवी. **महिलांस :** पतीराजांच्या आजारपणाने थकलेले मन पुन्हा ताजेतवाने होईल. सुखाचा प्रत्यय येईल.

**तूळ :** पैशाची कामे होतील

पहिले दोन दिवस चंद्र पैशाचा अपव्यय करण्याची शक्यता आहे. नवा करार, कर्ज देणे अगर काढणे यापैकी काहीच करू नये. सोमवार ते शुक्रवार मात्र सर्व क्षेत्रात नवे तेज, नवा उत्साह व नवा उपक्रम निर्माण करणारे दिवस आहेत. कंगन, साड्या, सौंदर्य प्रसाधने, दागिने या व्यवसायात तेजीचे वातावरण राहून हा धंदा करणाऱ्या व्यक्तीला बरे दिवस येतील. अकरावा मंगळ जमीन अगर घर स्थावर घेण्याचा हेतू सफल करील. सिने—नाट्यकलावत, गायक, चित्रकार व नृत्यकार यांना नवी कामे व कीर्ती, प्रसिद्धी मिळेल. साधू, उपासना-मार्गी व्यक्तींना उपासनेमुळे साक्षात्काराचा प्रत्यय येईल. नोकरीत काहीतरी चांगले घडेल. **महिलांस :** नैतिक सामर्थ्य वाढेल. नोकरीत अपेक्षित बदली.

**वृश्चिक :** नोकरीत प्रमोशन

दि. १६ रोजी रवी दहावा झाला आणि तुमच्या नोकरीविषयक व्यावसायिक जीवनाला एक प्रकारची आगळी प्रतिष्ठा लाभली आहे. तुमचे नोकरीतील स्थान उंचावले आहे. या आठवड्यात चंद्र व मंगळ उत्तम असल्यामुळे नोकरीत प्रमोशनचा जबरदस्त योग येईल. रासायनिक खताचे कारखाने, इंजिनियरिंग उद्योग, जमीनदारी, फ्लॅटची खरेदी-विक्री, शेती व शेतीची अवजारे यात काम करणारे नोकर व स्वतः मालक सुखी होणार आहेत. सहकारी शेतीच्या नोकरदाराना पगारवाढ होईल. इतर नोकरीत प्रमोशन मिळेल. रेल्वे व विमानवहातूक यातील नोकराना अजून काही काळ त्रास आहे. आर्थिक परिस्थितीला अनुकूलता येण्यासाठी अजून थांबावे लागेल. **महिलांस :** वरिष्ठ पदाच्या नोकरीसाठी तुम्हाला बोलावणे येण्याची शक्यता आहे.

**धनू :** प्रगतीला वेग

सिंह राशीत स्वगृही रवी आला आहे ही एकच घटना धनू-व्यक्तीच्या जीवनात नवा प्रकाश, नवे तेज व नव्या स्वप्नांची पूर्ती करायला पुरेशी आहे. आठव्या रवीने शरीर व मन विकलांग करून सोडले तर हा रवी आता कणखरपणे उभारणी करील. अनारोग्याने दीर्घकाळ ग्रासलेल्या शरीराला आरोग्याचा सुखद स्पर्श याच वेळी होईल. रविवार, मंगळवार, गुरुवार व शुक्रवार नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत व ठरतील. नोकरी नसणाऱ्यांना ती मिळेल. चालू नोकरीत डळमळीत झालेले आसन पुन्हा स्थिर होईल. प्रकाशन, मुद्रण, शिक्षण व सामान्य प्रशासन या क्षेत्रातील नोकरांना हा आठवडा लाभदायक व उत्साहाचा आहे. कोणत्याही प्रकारच्या स्वतंत्र व्यवसायाला हवी तेवढी अनुकूलता नाही. **महिलांस :** सातवा शनी पहिले दोन दिवस चंद्राची प्रतिकूलता लक्षात घेऊन भांडण टाळा.

**मकर :** अकल्पित घटना

आठवा रवी स्वतःच्या सिंह राशीत असल्यामुळे तो तुम्हाला तेवढी प्रतिकूल फळे देणार नाही. तरी पण डोके दुखणे, हातपाय वळणे, किरकोळ ताप येणे व विलक्षण धावपळ याचा थोडा तरी अनुभव घ्यावा लागेल. मंगळाची प्रतिकूलता आता फक्त हाच आठवडा उरली आहे. भाग्यस्थानी एकदा मंगळाचे आगमन झाले की तुमचा त्रास कमी होऊ लागेल. मात्र आठवे ग्रह जरी प्रतिकूल असले तरी हे ग्रह अंतरिक्षातील अत्यंत प्रबळ ग्रह आहेत. त्यामुळे ते तुमच्या नैतिक व व्यावसायिक जीवनात आगामी काळाची चाहूल देणाऱ्या अकल्पित घटना घडवल्याखेरीज राहाणार नाही. रेस व लॉटरीत लाभ, स्थावराची प्राप्ती, वारसदारीत वाटा असेही घडेल. नोकरीत मात्र कोणतेच धाडसी पाऊल नको. माघार घ्यावी लागली तरी ती घ्या. **महिलांस** माहेरची संपत्ती मिळेल. चांगली पत्रे येतील. नोकरीत उत्तम.

**कुंभ :** कौटुंबिक अस्वस्थता

सध्या तुम्हाला सावरून धरले ते फक्त एकट्या गुरूने. गुरू तुमचे संरक्षक कवच आहे. तुमच्या अवतीभवती विरोधकाचे जाळे, निंदकाची कट कारस्थाने व स्पर्धकाच्या कारवाया चालू आहेत. पण राशीतील गुरूच्या नैतिक व सात्त्विक तेजापुढे त्याचे काही चालत नाही. तुमची अखंड प्रगती वेगाने होत आहेच. राजकीय यश, सामाजिक प्रतिष्ठा उत्तरोत्तर तुमचे स्थान उंचावत आहेत. याही आठवड्यात याचाच प्रत्यय येईल. चालू नोकरीत फारशी अनिष्टता नसली तरी हातून नियमबाह्य असे काही घडू देऊ नका. हाताखालच्या सहकाऱ्यावर बारीक नजर ठेवा. वरिष्ठ व मालक याच्याबरोबर मिळते जुळते घ्या. त्यामुळे तुमचे हितच होईल. आर्थिकदृष्ट्या आठवडा वाईट नाही. जास्त पैसा मिळाला नाही तरी गरज भागेल. प्रवासात नव्या ओळखी. कौटुंबिक अस्वस्थता जाणवणार आहे. **महिलांस :** तीर्थयात्रा व प्रवास घडेल. मंगल कार्यात मन प्रसन्न राहील.

**मीन :** सूचक चाहूल

रवी व मंगळ सहावे आहेत. मंगळाची अनुकूलता हा आठवडाअखेरपर्यंतच आहे. कोर्टकचेरीची न्यायाची कामे याच आठवड्यात उरकून घ्या. रवी मात्र तुमचे सार्वजनिक व राजकीय कार्याचे क्षेत्र वाढवणार आहे. शनिवार ते सोमवार व बुधवार ते शुक्रवार विशेष महत्त्वाचे आहेत. गुरू अयोग्य खर्च होऊ देणार नाही. त्याचबरोबर पूजा-अर्चा. उपासना व चिंतन यात थोडा फार अडथळा येऊनच नंतरच यश येईल. नोकरीत काही प्रगतीकारक घटना घडतील. महत्त्वाच्या व नव्या कामासाठी वरिष्ठाकडून तुमची खास शिफारस होईल. नोकरीतील एकदर अनिश्चितता व अनिष्टता उताराला लागल्याची चाहूल याचवेळी लागेल. व्यवसायातही प्रगतीची चिन्हे दिसू लागतील. **महिलांस :** मन विचारमग्न राहील. माहेरच्या पत्राने मनाला हुरूप येईल. ☐ ☐

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## संजीव

### भल्या असामीच्या भलेपणाची पहिली ओळख

संजीवने अलीकडे आपल्याला धक्के देण्याचे ठरविले असावे. एक गोष्ट म्हणजे आज हिंदी चित्रपटात अदाकार म्हणून त्याच्या तोडीचा दुसरा नाही. आज टॉपच्या चार अदाकारामध्ये ज्याचे नाव घेतले जाते त्या रिशी कपूरचेही म्हणणे आहे, ' संजीवकुमार म्हणजे अदाकारीचा मानदंड आहे. ' असा हा संजीवकुमार कधी फारसा माणसाळलेला नव्हता. अनेक पार्टर्यावेळी त्याला भेटलो की तो नीट बोलायचा नाही. घुम्यासारखा एका कोपऱ्यामध्ये शराब घेत असायचा. नाईलाज म्हणून बोलायचा नी किती त्रोटक ! या माणसाविषयी कुणाचं बरं मत होणं शक्य नव्हतं. दुसरं म्हणजे हा माणूस, एरवी चांगला अदाकार आहे, हे बर्कलेचा जाहिरातपट पाह्यल्यावरही कळायचं. तरी ज्या ज्या नटीबरोबर काम करील त्या त्या नटीबद्दल काहीतरी स्कँडल झालंच पाहिजे, असा एक कित्येक दिवसांचा चाललेला प्रकार होता. त्याने ' देवी 'मध्ये नूतनबरोबर काम केले,–तिच्याशी स्कँडल झाले. तनुजाबरोबर स्कँडल होणं त्याला जमणार नव्हतं म्हणा. मग वहिदाबरोबर काम केले त्यावेळीही स्कँडल. इतकं की वहिदाने एक दिवस सर्व अखबारवाल्यांना फोन करून कळविलं, ' आपलं नी संजीवचं काही नाही '. त्यानंतर हेमा. ' सीता और गीता 'मध्ये हेमा नी संजीव एकत्र आले. हेमाचंही स्कँडल झालं. आणखी आम्हाला जी माहीत आहेत आणि पब्लिकला ठाऊक नाहीत त्यांचा इकडे उल्लेख न केलेलाच बरा.

त्यानंतर तिसरी गोष्ट म्हणजे त्याला कोणी हिरो म्हणून मानायला तयार नव्हता. एका इंग्रजी फिल्मी अखबारवाल्याने मला आपला अनुभव सांगितला. ' आमच्याकडे स्टार्स फोटो मागण्यासाठी अनेक फॅन्स येतात. मजा अशी की संजीवचा कधी कुणी फोटो मागितल्याचे आपल्याला आठवत नाही. संजीवचा फोटो कोणचीही फॅन हातात घ्यायला तयार नसते. ' (आणि तरीही या माणसाने फिल्मी जगतात एवढी स्कँडल्स करावीत ना ! ) अर्थात हा संजीव ' पारस ' ' मन मंदीर ' यांच्यासारख्या पिक्चर्समध्ये

हिरोगिरी करीत होता त्यावेळची गोष्ट. संजीवची अदाकारीच्या दृष्टीने त्या काळातली पिक्चर्स तीन. १. गुस्ताखी माफ २. ज्योती. ३. खिलौना. मजा अशी की यातील पहिली दोन पिक्चर्स ब्लॅक अँड व्हाईटमध्ये होती आणि दुसरे म्हणजे ' गुस्ताखी माफ 'मध्ये तनुजा आणि ' खिलौना 'मध्ये मुमताझ इतक्या टेरिफिक होत्या की, संजीवचे त्या पिक्चर्समधल्या अदाकारीबद्दल कोणी नावही घेत नाही. संजीवच्या अदाकारीविषयी ' टाईम्स 'च्या समीक्षकाने लिहूनच ठेवले होते. 'संजीवच्या अभिनयाच्या ठराविक लकबी आहेत. आणि त्या पलीकडे तो जात नाही म्हणून '. टाईम्सचा हा समीक्षक मुरब्बी समजला जातो. त्याने संजीवच्या अभिनयाची ही (!) पारख केली होती.

दिवस राजेश खन्नाचे होते. संजीवने हिंदी चित्रपटामध्ये कितीही हिरोगिरी करण्याचा प्रयत्न केला तरी राजेशपुढे त्याची डाळ शिजत नव्हती. ' स्टाईलबाजी एक होती है ना ! पिक्चर देखनेवालेके मन पर छा गई तो छा जाती है. राजेशच्या स्टाईलबाजीला मुकाबलाच नव्हता. या स्टाईलबाजीचा प्रभाव उडेपर्यंत सगळे हिरो हात चोळत-चुरमुरत बसले होते. आपण पण राजेश खन्ना टॉपला होता तोपर्यंत दुसऱ्या हिरोचा विचार करायला तयार नव्हतो. संजीव आपल्या लेखी कोई काम का आदमीच नव्हता. तो स्वतःपण सांगत असे. आपण तर बुवा फ्लॉप हिरो आहोत. एकदा संजीवचा दोस्त दिग्दर्शक विशू राजे याची नी माझी खूप जुंपली होती. विशू म्हणाला, ' संजीव हाच ग्रेट अदाकार आहे. '

संजीवला ' दस्तक 'च्या भूमिकेसाठी भारत अवॉर्ड मिळालं होतं. पण मला वाटलं संजीवची तो भूमिका खुलली नाही. अखेरच्या दृश्यात परिस्थितीने गोची केल्यावर तो उन्मळून रडतो. तोच त्याच्या अदाकारीचा चांगला भाग होता.

संजीव का चमकत नव्हता ? कार्डबोर्ड भूमिका त्याच्या ' बसकी बात ' नव्हती ? का त्याला स्टाईलबाजी करता येत नव्हती ? का तो स्थूल होता ? का त्याला चांगल्या रितीने हाताळील अशा दिग्दर्शकाची गरज होती ? कुणास ठाऊक. राजेशला हिरोगिरीची सद्दी संपल्यावर आपल्या भूमिकामध्ये काही कॅरेक्टर असावे असे वाटू लागले होते. संजीवला त्याची केव्हाच गरज वाटत होती. चांगली कथा, चांगला



**अमीर (प्रेमनाथ)–गरीब (देव आनंद) यांची पडद्यावरील चालू लढाई**

हाताळणारा दिग्दर्शक याशिवाय सजीवचे आता काम चालण्यासारखे नव्हते. ' कोशिश ' मध्ये त्याला ही पुजी मिळाली नी मग तो सर्व अदाकाराना मागे टाकून पुढे गेला. आता सजीवकुमार रिलॅक्स्ड वाटतो. मनचली, अनामिका, अनहोनी अनुभव, मनोरजन ही कोशिश आणि परिचय नतर त्याची, नाव रोशन करणारी पिक्चर्स. प्रत्येक पिक्चरला एक स्टोरी होती. गुलझार, रवी टडन, राजा नवाथे, शम्मी कपूर हे त्याचे दिग्दर्शकही त्याच्या गुणाची कदर करणारे होते. आज तो धर्मेन्द्र इतका पॉप्युलर नसेल पण, अदाकार म्हणून त्याने धर्मेन्द्रलाही मागे टाकले आहे. एक आणखी गोष्ट. पूर्वीचा घुम्या, एखाद्या पार्टीत शराबचा ग्लास घेऊन एका कोपऱ्यामध्ये बसणारा सजीव राहिला नाही. कुठच्याही पार्टीत तो शरीक झाला की म्हणतो, ' मी जरा लोकाना भेटतो– जरा चक्कर मारतो. ' पर्वा त्याने ' नया दीन नई रात ' मधल्या आपल्या भूमिके विषयी बोलताना, ' त्या चित्रात काम करण्याबद्दल दिलिप कुमारनेच माझे नाव सुचवले ' असे सागितले, त्यावेळी दिलिपकुमारने सुचवावे म्हणजे काय ?' असा भाव नव्हता त्याच्या चेहेऱ्यावर, ती भूमिका आपलीच होती. ' दिलिप आपले नाव सुचवणार नाही, दुसऱ्या कुणाचे ?' हा त्याच्या बोलण्यात आत्मविश्वास होता.

संजीव खूपच सुधारला आहे आता. हेमाने प्रेमभग केल्यावरही. मागे ' सुबह और शाम 'च्या पार्टीच्या वेळची गोष्ट. वहिदा आणि त्याच्यामध्ये अफवा उठल्यानतर, वहिदाला सामोरे जाताना, तो काय नर्व्हस होता. दोघेही एकमेकांशी बोलत नव्हते. आणि आम्ही इराणच्या फिल्म इडस्ट्रीवर बोलण्याची त्याना सूचना दिली तेव्हा वहिदाने सजीवचे नाव सुचवले पण सजीव तोडातून शब्द काढायला तयार नाही. अखेर वहिदानेच माहिती दिली. पण आता तो हेमा समोरही लाजायचा नाही कामयाबीमुळे माणूस सुधारतो. ' जजीर'च्या यशानंतर अमिताभ मध्ये नाही का बदल झाला ?

पर्वा ' धूप–छाव 'च्या सेटवर प्रथम सजीवला आत्मविश्वासाने आणि दिलखुलासपणे अखबारवाल्यांशी बोलताना पाहिले – आमच्या एका अखबारवाल्या मित्राने त्याची ' नया दीन-नई रात ' मधली भूमिका बकवास आहे ' म्हणून म्हणताच त्याने त्याला पकडले होते. आपल्या अदाकारीचे आत्मविश्वासाने हा नट समर्थन करताना पाहिला त्यावेळी फिल्म इडस्ट्रीमध्ये आजही कणा असलेले अदाकार आहेत असे वाटले. नायतर ज्याला विचारावे तो ' ऐसे ही वो काम किया था ' असे सागून, हात झटकतो. संजीव म्हणाला, ' मी प्रत्येक नऊ भूमिकेत वेगवेगळा माणूस दिसतो की नाही ?' माझा मित्र म्हणाला, ' त्यात काय झाले. तुमची महारोग्याची भूमिका ही मेकप-मॅनची कमाल आहे ' सजीव– ' अस्सं. माझ्या जागी अनील धवन असता तरी हेच म्हटल असत तुम्ही ?' त्यावर मित्र म्हणाला, ' तुम्हाला काही काही वेळा जयाने खाऊन टाकलय. ' सजीव म्हणाला, ' हे पहा मी कुणाला खात नाही. जी दिग्दर्शकाची माझ्याकडून अपेक्षा असेल तेच मी काम करतो. '

त्यानतर मी म्हणालो की, ' नया दीन ' मधला तुमचा ॲक्टर अफलातून होता. माझ्या टीकाखोर मित्राने अनवधनाने माझ म्हणणे सजीव समोरच मान्य केले. सजीवने मग तो पॉईंट पकडला, ' छे., छे त्यात माझे कसले काम आहे. सगळे मेकपमनचेच काम आहे ! ' बिचारा मित्र !

संजीवने अखबारवाल्याना एकत्र आणले, त्यांच्याशी दोन रात्री दिलखुलास गप्पा केल्या. ही एक संजीवच्या जिदगीमधली खास बात झालीच. आता तो स्वत.ची पिक्चर्स काढणार आहे. गुजराथी रगमचावरील दिग्दर्शक प्रवीण जोशी यांच्याकडे त्यांनी दिग्दर्शनाची सूत्रे सोपविली आहेत. ' कै. गुरुदत्तनी प्रथम आरपार, बाझी ही कमर्शिअल पिक्चर्स काढली. नतर प्यासा, कागझ के फूल ही चित्रे काढली, त्याच मार्गाने जाणार आहे. ' तीन धदा करणारी चित्रे काढल्यानतर मी सर्व सूत्रे प्रवीणकडे देणार आहे. व बाहेर पडणार आहे. मग त्याने हवे तसे चित्र काढावे. '

एका आपल्या जवान मित्राला उभा करण्यासाठी सजीव धडपडतो आहे. ही एक त्याच्या स्वभावातली नवी झलक दिसली. आतापर्यंत हा भला असामी भला म्हणून कुणाला ठाऊकच नव्हता.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# सांध्यवेळच्या तेजासारखे तिमिरावगुंठित असे ते वेगवान जीवन

¤ आपल्या टॉलस्टॉय विषयक अभ्यासाचा व सुदर भावपूर्ण गद्य-शैलीचा माझ्या मनावर फार उत्तम असा प्रभाव पडला. पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर आमच्या ग्रथालयात घेतले जाईलच व मी ते अगत्यपूर्वक वाचीन.

**प्रभाकर माचवे, दिल्ली**

¤ वास्तविक तुम्ही लिहिलेल्या टॉलस्टॉयच्या चरित्राचे हस्तलिखित वाचल्यावर मीच तुम्हाला पत्र लिहायला हवे होते. मला तुमचे लेखन अतिशय आवडले. जगातल्या निरनिराळया क्रात्या-उत्क्रांत्यांनी म्हणा, किंवा सामाजिक, राजकीय इत्यादी स्तरावर माडलेल्या गणितांची उत्तरे सापडल्याच्या आनदात असणाऱ्या विचारवताना ती चुकीची निघाल्याचा अनुभव येऊ लागल्यामुळे म्हणा, विचारवत पुन्हा एकदा गाधी-टॉलस्टॉय यासारख्या ऋषीवर्यांकडे वाट पुसायला जाणार असे मला वाटू लागले आहे तुमच्या आगामी ग्रथाचे म्हणून मला फार मोठे मोल वाटले.

**पु. ल. देशपांडे, पुणे**

¤ टॉलस्टॉयविषयी एकदा पुष्कळ वाचले आहे पण केवळ माणूस या नात्याने ५०० छापील पाने भरण्याइतका मजकूर काय असेल याची उत्सुकता माझ्या ठिकाणी उत्पन्न झाली आहे.

**न. र. फाटक, मुंबई**

¤ टॉलस्टॉय या विषयावर लेखिकेने केलेल्या सर्वांगिण वाचनाचा मराठी वाचकाना फार उपयोग होईल, असा मला भरवसा वाटतो. शैलीमुळे ग्रथ कादबरीसारखा रजक वाटेल.

**श्री. के. क्षीरसागर, पुणे**

¤ I find the writing very gripping and perspective. I am looking forward to the publication of the book with great interest.

**S B. Kulkarni**
Divisional Commissioner, Poona.

¤ टॉलस्टॉयचा शोध घेण्याचा प्रयत्न लेखिकेने खूपच कसोशीने केला आहे यात शका नाही.

**अशोक दा. रानडे, मुंबई**

¤ मराठी भाषेत एक अमोल ग्रथ लिहिलात यात काडीमात्र शका नाही. हा ग्रथ एक नमुनेदार चरित्रग्रथ म्हणून नावाजला जाईल, अनेकाना तो स्फुरण देणारा ठरेल, अनेकाना त्याच्या जीवनाच्या विसाव्याचे स्थान या ग्रथात सापडेल असे मला वाटते.

**वि. वि. पेंडसे, ज्ञानप्रबोधिनी, पुणे**

¤ असच काही भरीव, लोभस विचारघन आम्हाला वाचायला देत चला.

**सौ. सुमन पंढरीनाथ रानडे, औरंगाबाद**

¤ परवाच्या मडळाच्या सभेत या ग्रथाबद्दल प्रशसोद्गारच निघाले.

**अनंत काणेकर, मुंबई**

¤ टॉलस्टॉयने जीवनात जितक्या चुका आणि जेवढी क्रूर कृत्ये समजून न समजून केली तशी कुणी केली नसतील. टॉलस्टॉयने जेवढ्या तळमळीने जीवनाचे गूढ व जीवनाची प्रेरणा समजून घेण्याचा प्रयत्न केला तसाही क्वचित कुणी महाभाग करतो. पाप-पुण्याच्या सघर्षाच्या ठिणग्या त्याच्या मनात जशा पेटल्या तशाही कुणा लेखकाच्या मनात क्वचितच पेटतात. मृत्यूचा जीवनभर कानोसा घेणारा हा माणूस सतत सद्सद्विवेकाचा वेध घेत राहिला. सांध्यवेळच्या तेजासारखे तिमिरावगुठित असे ते वेगवान जीवन कालमुखात कसे शिरते याचा प्रत्यय सौ. सुमती देवस्थळे आपल्याला आणून देतात.

**दुर्गाबाई भागवत, मुंबई**

¤ सौ. सुमती देवस्थळे यानी लिहिलेला 'टॉलस्टॉय-एक माणूस' हा ग्रथ येत्या ऑगस्ट-सप्टेंबरात प्रसिद्ध होत आहे.

¤ साहित्य सस्कृती मडळाने अनुदान दिल्यामुळे या पाचशे पानाच्या ग्रथाची किंमत पंचवीस रुपये ठेवणे शक्य झाले आहे. एरवी आजच्या भीषण टचाई-महागाईच्या काळात ही किंमत सहजच रुपये पन्नासपर्यंत ठेवावी लागली असती.

¤ मडळाच्या नियमाप्रमाणे ही प्रथमावृत्ती फार मर्यादित प्रतीची काढावी लागत आहे ग्रथाचे जे सर्व थरातून स्वागत होत आहे ते पाहता दुसऱ्या आवृत्तीचाही योग संभवतो. पण असा योग आला तरी या दुसऱ्या आवृत्तीची किंमत वर म्हटल्याप्रमाणे भरमसाट राहाणार हे उघड आहे. म्हणून शक्यतो या पहिल्या आवृत्तीची प्रतच हस्तगत करणे सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीने इष्ट आहे.

¤ १५ ऑगस्टपर्यंत नोंदणी करणाऱ्याना आणखी थोडी सवलत देता येईल. पाच रुपये कमी पाठवावेत. रुपये पचवीस ऐवजी वीस फक्त. रुपये वीस मात्र ताबडतोब पाठवावेत.

¤ ग्रथ राजहंस प्रकाशन कार्यालयातून नेण्याची व्यवस्था किंवा पोस्ट पाठवणी खच ज्याचा त्याने करावयाचा आहे.

¤ साप्ताहिक माणूसची वर्गणी म्हणून रुपये शंभर भरणाऱ्यास अडीच वर्षे अक, शिवाय हा ग्रथ देण्याची सवलत अजूनही काही दिवस चालू आहे..

**टॉलस्टॉय एक माणूस** | **प्रथमावृत्ती : १९७४** | **राजहंस प्रकाशन**

**सौ. सुमती देवस्थळे** | **किंमत रुपये पंचवीस** | **१०२५ सदाशिव, पुणे ३०**